बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर
धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक १७४ वा । गुरूवार दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १.५० ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकरभोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### अवैध मद्य विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत भिमाबाई ,रा. कोळसुर (क) ता. उमरगा जि. धाराशिव या दि.१३.०९.२०२५ रोजी वडर गल्ली कोळसुर कल्याण येथे अंदाजे १,४०० किंमतीची १४ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर अनिलराव , रा. हिप्परगा घाट ता. बस्वकल्याण जि. बिदर ह.मु. काळे प्लॉट उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.१३.०९.२०२५ रोजी भाजी मार्के उमरगा येथे अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

मुरुम पोलीस ठाणे अंतर्गत रेवणसिध्द रा. आलुर ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.१३.०९.२०२५ रोजी आलुर ते अक्कलकोट जाणारे रोडचे बाजूस अंदाजे ३,२०० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या १० सिलबंद बाटल्या व २५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### मोटारसायकलसह केबल, पानबुडी आदिची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी विशाल सुनिल मुंढे, वय ३१ वर्षे, रा. पवारवाडी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे २५,००० किंमतीची मोटरसायकल. मिटर केबल,पानबुडी एक, स्प्रिंक्लरचे ०४ चिमण्या व १०० मिटर केबल असा एकुण ३८,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने दि. ०६०९.२०२५ रोजी पवारवाडी शिवारातील विशाल मुंढे यांचे शेतातुन चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- विशाल मुंढे यांनी दि.१३.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१३ सप्टेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १५५ कारवाया करुन १,२७,२०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

झाडे लावा!
झाडे जगवा!!
झाडे तोड रोखा !!!

# आधुनिक, डिजिटल, प्रगत जिल्हा बनविण्यासाठी सक्रिय सहभागी व्हा!- पालकमंत्री प्रताप सरनाईक

***मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचा वर्धापन दिन उत्साहात *पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण, स्मृती स्तंभास पुष्पचक्र अर्पण**





धाराशिव, (जिमाका) : राज्य शासन आणि जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून धाराशिव जिल्ह्याला आधुनिक, डिजिटल आणि प्रगत जिल्हा बनवायचे आहे. यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे. म्हणून नागरिकांनी यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन राज्याचे परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. यासह जिल्ह्यातील नागरिक, शेतकरी यांना समृद्ध करण्याचे स्वप्न आपण सर्वजण मिळून साकार करूयात, असा विश्वास व्यक्त करत मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या पालकमंत्री सरनाईक यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री सरनाईक यांच्या हस्ते झाले. तत्पूर्वी त्यांनी स्मृती स्तंभास पुष्पचक्र अर्पण करत मराठवाड्याच्या स्वातंत्र्यसैनिकांना मान्यवरांनी आदरांजली वाहिली. मराठवाड्याचा, जिल्ह्याचा गौरवशाली इतिहास आणि जिल्ह्याच्या प्रगतीसाठी सुरू असलेल्या विविध योजनांवर पालकमंत्री सरनाईक यांनी शुभेच्छा संदेशातून प्रकाश टाकला.

या प्रसंगी खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास घाडगे-पाटील, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, जिल्हा पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिक गोविंद नलावडे, नागनाथ कुंभार, भास्कर नायगावकर, कलावंतीबाई उमरे, बायडाबाई भिंगरे, यांसह स्वातंत्र्य सैनिकांचे नातेवाईक, ज्येष्ठ नागरिक, पत्रकार, विविध विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी आदींची उपस्थिती होती.

पालकमंत्र्यांच्याहस्ते मराठा समाजास आरक्षण मिळण्यासाठी आत्महत्या केलेल्या मयत व्यक्तीचे वारसदार कोमल भोसले, शिवाजी निलंगे यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून प्रत्येकी दहा लाख रूपयांचा, तर नैसर्गिक आपत्ती सहाय्यता निधीमधून फुलुबाई इंगळे चार लाखांचा धनादेश देण्यात आला. कुणबी जात प्रमाणपत्रांचेही प्रातिनिधिक स्वरूपात पालकमंत्र्यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. सिरेंटिका रिन्यूबल एनर्जी कंपनीच्या सीएसआर अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या युवांना देखील प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्रांचे वितरण पालकमंत्री यांच्याहस्ते झाले. कार्यक्रमानंतर पालकमंत्री सरनाईक यांनी उपस्थित स्वातंत्र्यसैनिक, ज्येष्ठ नागरिक, नागरिक, यांना भेटून मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यांना शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन गौरवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत पडवळ यांनी केले.

**पालकमंत्री यांच्या शुभेच्छा संदेशातील काही ठळक बाबी**

**स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन; योगदानाला उजाळा**

पालकमंत्री सरनाईक यांनी आपल्या भाषणाची सुरुवात मराठवाड्याच्या स्वातंत्र्यसंग्रामात हौतात्म्य पत्करलेल्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र अभिवादन करून केली. त्यांनी सांगितले, १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा भारतीय संघराज्यात विलीन झाला. निजामाच्या जुलमी राजवटीविरुद्धच्या या लढ्यात सर्व समाजघटकांनी, विशेषतः महिला आणि विद्यार्थ्यांनी मोठा सहभाग नोंदवला. त्यांनी धाराशिव जिल्ह्यातील लोहारा तालुक्यात हिप्परगा येथे स्थापन झालेल्या राष्ट्रीय शाळेचा उल्लेख केला, जिथे स्वामी रामानंद तीर्थ यांनी प्राचार्य म्हणून काम केले आणि अनेक क्रांतीकारक घडवले. महिला स्वातंत्र्यसैनिकांनीही गुप्त माहिती पोहोचवणे, भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांना आश्रय देणे यांसारखी महत्त्वाची कामे केल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

मराठवाडा मुक्तीसंग्रामासाठी लढणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांनी आपले सुरक्षित स्थळ निर्माण केले होते. यालाच कॅम्प म्हटले जायचे. अशाच प्रकारचे कॅम्प धाराशिवच्या परिसरात जुलै १९४७ ते मार्च १९४८ या कालावधीत गौडगांव, बार्शी, चिंचोली, वाघोली, आंबेजवळगे, कौडगांव, वाघदरी, पानगांव मुस्ती व इट या भागात सक्रीयपणे कार्यरत होते. या बंदीला झुगारुन स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. धाराशिव तालुक्यातील चिलवडीच्या रामभाऊ जाधव या स्वातंत्र्य सैनिकाने शेकडो लोकांना एकत्र करुन खेड्यापाड्यात तिरंग्याची मिरवणूक काढली. सन १७६० मध्ये मराठवाडा या शब्दाच जन्मही जिल्ह्यातच झाला. १३ सप्टेंबर १९४८ रोजी ऑपरेशन पोलो मोहिमेअंतर्गत भारतीय लष्कराने चारही बाजुंनी हैद्राबादमध्ये सैनिक घुसविले. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती पत्करली, असेही त्यांनी सांगितले.

**युनेस्कोच्या वारसा यादीत किल्ले !**

११ जुलै २०२५ रोजी आपल्या सर्वांचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अतुलनीय शौर्याची साक्ष देणाऱ्या शिवनेरी,राजगड,प्रतापगड,पन्हाळा, साल्हेर, लोहगड, खांदेरी, सुवर्णदुर्ग,विजयदुर्ग, सिंधुदुर्ग आणि जिंजी या १२ किल्ल्यांचा समावेश युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत करण्यात आला. ही आपल्या सर्वांसाठी अतिशय अभिमानाची बाब आहे.

**जिल्हा विकासासाठी विविध उपक्रम, योजना**

पालकमंत्री सरनाईक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात १०० दिवस कार्यालयीन सुधारणा उपक्रमांचा पहिला टप्पा यशस्वीरित्या पूर्ण झाला. पुढील १५० दिवसांच्या सुधारणा टप्प्यास गती मिळाली, यासह जिल्ह्यातील विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. 'विकसित भारत-२०४७' आणि 'विकसित महाराष्ट्र-२०४७' च्या व्हिजननुसार जिल्हा विकासाचा आराखडा तयार करण्यात येत आहे, असे सांगितले.

डिजिटल आणि पारदर्शक प्रशासन: 'तुळजाई चॅटबॉट', 'कल्पवृक्ष स्मार्ट-जीआर', 'कार्यसिद्धी पोर्टल', 'सिंगल विंडो सिस्टीम' आणि 'जीवनरेखा पोर्टल' यांसारखे विविध डॅशबोर्ड व डिजिटल पोर्टल्स सुरू करण्यात आले आहेत. यामुळे प्रशासन अधिक पारदर्शक आणि नागरिकाभिमुख झाले आहे.

**सेवा पंधरवडा :** महसूल विभागामार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जन्म दिवस १७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत 'छत्रपती शिवाजी महाराज, महा-राजस्व अभियान' अंतर्गत 'सेवा पंधरवडा' साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत पाणंद रस्ते मोहीम, सर्वांसाठी घरे या उपक्रमांतर्गत २०११ पूर्वीचे रहिवासी प्रयोजनासाठी असलेले शासकीय शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची कार्यवाही केली जाईल. तरी नागरिकांनी या पंधरवड्यात सहभागी होण्याचे आवाहन सरनाईक यांनी केले.

**नोकरी आणि रोजगार :** ग्रामीण व शहरी भागात ५४० नवीन 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. तसेच, अनुकंपा भरती अंतर्गत उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरू आहे. भरतीसाठी जिल्हास्तरावर १९ पात्र उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली आहेत. त्यांना नोकरीत सामावून घेण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. तसेच धाराशिव जिल्हयातील विविध विभागामार्फत गट-ड मधील एकूण ३५ अनुकंपाधारकांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरु आहे.

**जनता दरबार :** नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी जिल्हास्तरापासून मंडळस्तरापर्यंत सोमवार, बुधवार आणि शुक्रवार सकाळी ११ ते ०१ या वेळेत 'जनता दरबार' आयोजित केला जातो, याचा नागरिकांनी लाभ घ्यावा.

**महत्वाकांक्षी प्रकल्प, यश**

भारताला २०४७ पर्यंत विकसित भारत बनविण्याच्या प्रवासात भारत सरकारने २०२५-२६ पर्यंत अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्याचप्रमाणे राज्यानेही २०४७ पर्यंत आपली अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविण्याचे लक्ष्य ठेवले आहे. या जिल्हा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यातील महत्त्वाच्या उपक्रमांसाठी जिल्हा वार्षिक योजनेतील २५ टक्के निधी देण्याचे शासनाचे निर्देश आहेत. या आराखड्यात अनेक नाविण्यपूर्ण योजना राबविण्यात येत आहेत, त्यामध्ये

**इनडोअर हॉलचे आधुनिकीकरण:** श्री. तुळजाभवानी स्टेडियममधील इनडोअर हॉलसाठी ३.४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामुळे खेळाडूंना आधुनिक प्रशिक्षण सुविधा मिळतील.

नीती आयोगाच्या कामगिरीत तिसरा क्रमांक: नीती आयोगाच्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात धाराशिव जिल्हा देशात तिसऱ्या क्रमांकावर आला आहे. विशेषतः कृषी आणि जलसंपदा क्षेत्रात अव्वल स्थान मिळवल्यामुळे जिल्ह्याला सहा कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी मिळाला आहे. संपूर्णतः अभियानांतर्गत जिल्ह्याला कांस्य पदक प्राप्त झाले, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे.

श्री. तुळजाभवानी मंदिर विकास आराखडा: १८६५ कोटी रुपयांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प भाविकांसाठी सुविधा वाढवेल. हा शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. पर्यटन विभागाने श्री. तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सवाला राज्यातील प्रमुख महोत्सवाचा दर्जा दिला आहे, ही आपणा सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे.

**इतर महत्त्वाचे उपक्रम :** सोयाबीन पिकासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, शासकीय वैद्यकीय व महाविद्यालयाकडून स्त्री रूग्णालय येथे प्रशासनाच्या मदतीने रक्त साठवण केंद्र सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच गर्भावस्थेतील रोगनिदान होण्याच्या दृष्टीने 'उम्मीद' केंद्र सुरू करण्यात येत आहे. 'मोतीबिंदूमुक्त महाराष्ट्र' अभियानांतर्गत ३२२ मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. अवयवदान जनजागृती अभियानाच्या माध्यमातून विशेषत: एका संस्थेने पुढाकार घेऊन एकाच महिन्यात तीन देहदान केले, जे एक प्रशंसनीय व ऐतिहासिक पाऊल आहे.

**'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' मोहिमेचा शुभारंभ**

याच कार्यक्रमात 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या महत्त्वाकांक्षी अशा जिल्ह्यातील मोहिमेचा शुभारंभ पालकमंत्री यांच्या हस्ते आज झाला. ही मोहीम केवळ आरोग्य तपासणीपुरती मर्यादित नसून, प्रत्येक कुटुंबाला आणि समाजाला सशक्त बनवण्याचे पाऊल असल्याचे पालकमंत्री सरनाईक यांनी सांगितले. महिला निरोगी राहिल्यास त्या कुटुंबाची अधिक चांगली काळजी घेऊ शकतात,असेही ते म्हणाले.

## धाराशिव प्रशालेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण



धाराशिव (प्रतिनिधी) : उस्मानाबाद जिल्हा स्वातंत्र्य सैनिक समिती धाराशिव यांच्या वतीने धाराशिव प्रशाला व स्वामी रामानंद तीर्थ प्राथमिक विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने संस्थेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब जाधव यांच्या शुभहस्ते ध्वजारोहणाचा सोहळा पार पडला.

सोहळ्याच्या प्रारंभी स्वातंत्र्य संग्रामातील अमर वीरांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संस्थेच्या कार्यकारी संचालिका सौ. चित्राताई प्रकाशराव मालखरे यांना श्रद्धांजली अर्पण करून उपस्थितांनी त्यांच्या योगदानाची आठवण केली. कार्यक्रमादरम्यान मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर थोडक्यात प्रकाश टाकण्यात आला.

या वेळी समितीचे सचिव दिलीप गणेश, उमाजीराव देशमुख, ॲड. सुग्रीव नेरे, प्रदीप गणेश, अण्णासाहेब वडगावकर, अरुण माडेकर, बालाजी जाधव, धनंजय माळी, मुख्याध्यापक पंडित जाधव, उषा माने यांच्यासह दोन्ही शाळांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन चंद्रकांत माळी यांनी केले.

## पोलिसाकडून जुगार विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत जुगार विरोधी कारवाई दरम्यान उमरगा पोलीसांनी दि.१३.०९.२०२५ रोजी उमरगा पो ठाणे हद्दीत २ ठिकाणी छापा टाकला. यावेळी अविनाश रा.झोपडपट्टी गल्ली डिग्गी ता. उमरगा जि. धाराशिव हे १४.३० वा. सु. डिग्गी येथे बसस्थानकच्या पश्चिम बाजूस कल्याण मटका जुगाराचे साहित्य एकुण ८७० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले उमरगा पो. ठाणेच्या पथकास आढळले. शामराव , रा.धाकटीवाडी ता. उमरगा जि. धाराशिव हे राजु हॉटेलच्या बाजूस पत्र्याचे शेड जवळ आर टी ओ चेक पोस्ट तलमोड येथे कल्याण मटका जुगाराचे साहित्य एकुण १,१०० रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले उमरगा पो. ठाणेच्या पथकास आढळले.यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम- १२ (अ) अन्वये उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## पावसाने केला कहर, लक्ष मदतीकडे ?

निसर्गाच्या संकटापुढे कोणाचे कांही चालत नाही. यावर मात करण्याची तयारी ठेवली पाहिजे. आता देशाबरोबर राज्यात पावसाने मोठे संकट उभा केले आहे. खरीपाचे पीक महाराष्ट्रातील जनतेच्या हातून जाण्याच्या मार्गावर, सोयाबिनच्या राणात पाणीच पाणी साचले आहे. सोयाबिन काढण्याच्या स्थितीत असताना राणात पाणी याचा अर्थ हातून जवळपास जाण्यासारखे आहे. हाती काही लागेल असे वाटत नाही. मुळात निसर्गाचा कहर २०२५ म्हणजे देशात पाणीच-पाणी करणे हाच दिसून येतो. देशातील जवळपास सर्वच राज्यात पाणीसंकट निर्माण झाले आहे. पंजाब म्हणजे उत्तरेकडील भारतात पाणीसंकट निर्माण झाले आहे. निसर्गाचे संकट सांगून येत नाही. कधी अचानक येते. त्यामुळे यावर मात करण्याची तयारी सर्वांनी ठेवली पाहिजे. राज्यातील अनेक जिल्हे हे प्रभावित झाले आहेत. अनेक जिल्ह्यात पाणी असल्याने संपर्क तुटला असून काही जनावरे सह माणसे वाहुन गेल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे एक प्रकारचे संकट निर्माण झाले आहे. महाराष्ट्रातील सरकारचे या बाबत ठोस असे पाऊल उचलेले आहे असे दिसून येत नाही. अजूनतरी नुकसान भरपाईची मदत खात्यात जमा झाली नाही. त्यामुळे या पावसाच्या नैसर्गिक संकटावर कशा प्रकारे मात करावयाची हेच मोठे संकट उभा राहीले आहे. देशात आज पर्यंत आलेल्या संकटावर सरकारने मदत केल्याने काही प्रमाणात दूर झाली आहेत. राज्यात बहुतांशी मंडळी ही शेती करतात. कृषीप्रधान देशात महाराष्ट्र असा प्रांत आहे की, येथे शेती बरोबर फळबागा आहेत. अशा फळबागांचे नुकसान झाले आहे. आज बाग लावली की, लागलीच उत्पन्न मिळते असे नाही. एक बाग लावण्यासाठी खर्च बराच येतोच त्यापेक्षा बागेत फळे तयार होण्यास सहा ते एकवर्षाचा आवधी लागतो. ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे महाराष्ट्रात फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. राणात किती दिवस पाणी राहाते हे सांगता येत नाही. आता पावसाळा आहे. या परतीच्या पावसाने मोठी दैना केली आहे. यानंतर हिवाळा सुरु होतो. या हिवाळ्यात थंडी असते. उन्हाचा पत्ता नसतो. त्यामुळे राणांतील पाणी मुरण्यात वेळ लागणार आहे. राणांत पाणी असेल तर जमीनीचा पोत कमी होतो. कस कमी होतो. जमीन नापीक होते हा धोका निर्माण होतो. सरकार तरी मोठी मदत करेल असे वाटत नाही. काहींचे जनावरे मेली तर काहींचे पीका बरोबर जमीनीची मातीच वाहून गेली आहे. खडक दिसून येत आहे. अशा स्थितीत शेतकरी हा या निसर्गाच्या कोपामुळे संकटात सापडला आहे. मुळात अचानक संकट कोसळले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात परतीच्या पावसाने कहर होईल असे वाटले नव्हते. जून-जुलै महीण्यातच पाऊस पडतो मात्र सप्टेंबर मध्ये संकट उभा राहीले आहे. वास्तविक सप्टेंबर-ऑक्टोंबर या महिण्यात उष्णता निर्माण होते. सर्व काही विपरीत घडत असल्याचे दिसून येत आहे. या संकटावर मात करणे आवघड आहे. त्यात या दोन महिण्यात मोठी सण आहेत. दसरा व दिवाळी या सणात पैसा अधिक लागतो. त्यामुळे अशा सणात खर्च करणे आवघड दिसून येणार आहे. ज्या भरोशावर आर्थिक बळ मिळेल तीच अपेक्षा संपल्या जमा आहे. सोयाबिन बरोबर जे काही रब्बीचे पीक हाती लागेल त्यावर सण आनंदाने साजरे केला जातो. आता खरीपपीकावरच पावसाचे मोठे संकट निर्माण झाले आहे. पंचनामे होणार आहेत असे सांगितले जात आहे. अजून तरी प्रत्यक्षात पंचनामे चालू असल्याचे दिसून येत नाही. वास्तविक प्रत्यक्षात पंचनामे ही विज्ञान युगात कालबाह्य होत आहे. आता प्रगत विज्ञानयुग आहे. सॅटेलाईटद्वारे माहिती मिळू शकते. किती नुकसान झाले हे विज्ञान तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कळू शकते. अशा स्थितीत प्रत्यक्षात पंचनामे करणे योग्य वाटतात का? पंच म्हणजे पाच व्यक्तीने ठरविणे, पंच म्हणजे पाच असाच होते. आता ही जुनी पद्धतीला विराम देण्याची गरज आहे. अत्याधुनिकतेचा वापर होणे गरजेचे आहे. किती नुकसान कोणत्या भागात हे क्षणात कळते. आता पर जिल्ह्यात, परप्रांतात कसा पाऊस पडतो हे घरबसल्या मोबाईलद्वारे कळू शकते. पंजाब, हरियाणा, हिमाचलप्रदेशात काय चालू आहे हे क्षणात कळते. अशी सुविधा आहे. त्यामुळे तातडीने मदत देणे योग्य आहे. या बाबत सरकार अजून तरी हालचाल करीत आहे असे सांगण्यात येते. महाराष्ट्रात शेतकऱ्यावरील संकटापेक्षा जी जातीय आंदालने उभा राहात आहेत त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे कोठे दुर्लक्ष होते की काय असे वाटायाला लागले आहे. जातीय आरक्षणाचे आंदोलने ही एक नशा असते. जात ही एक नशा आहे ती न जाणारी जात आहे. जाता जात नसते ती जात असेही जुनी जाणकार मंडळी बोलत असतात. त्यामुळे जातीवर आरक्षणाचा मुद्दा लागतीच थंड होईल असे वाटत नाही. आज पर्यंत आरक्षणाकडे कोणत्याही सरकारने लक्ष दिले नाही, आता मात्र विद्यमान सरकारच्या नशीबी हे काम करण्याची पाळी आली आहे. अशा स्थितीत शेतकऱ्याच्याप्रश्नाकडे दुर्लक्ष होता कामा नये. काही तरी सरकारकडून पंचनामे होतील तेंव्हा होतील तो पर्यंत आर्थिक मदतीची गरज आहे. आगामी काळात मोठी सण आहे. दसरा व दिवाळी या सणात मोठा खर्च होतो. त्यामुळे सरकारने केवळ घोषणा करू नयेत. प्रत्यक्षात शेतकऱ्याच्या पदरात काही तरी टाकले पाहिजे असे काम करण्याची गरज आहे. राज्यात खरीपतर जवळपास हातून गेल्याचे दिसून येते आता त्यामुळे आगामी रब्बीवर शेतकऱ्याची नजर आहे. रब्बीला सध्या झाला तेवढा पाऊस पिक हाती येण्यासाठी बरा आहे. नदी, नाले व विहीरी भरल्या आहेत. विंधनविहीरी चालू झाल्या आहेत. आगामी काळात पाण्याची कमतरता भासणार नाही. असे दिसून येते. पाऊस काळ चांगला झाला आहे. पावसाने पिण्याचा पाण्याचा प्रश्न मिटला आहे. ही मोठी समाधानाची बाब आहे. निसर्गाने शेतकऱ्याचे मोठे नुकसान पिकाचे, शेतीचे केले आहे. हे सर्वांना कळून येते. शासन किती हेक्टरचे नुकसान झाले आहे हे सांगत. दररोज किती पाऊस पडतो आहे. धरणाचे दरवाजे किती उघडले त्याच प्रमाणे पाण्याचा विसर्ग किती होत आहे हे शासनदरबारी सांगगितले जात आहे. त्यानुसार किती शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. हे कळून येते. त्यानुसार आता नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. सरकार माय-बापाने या बाबत लक्ष दिले पाहिजे. शेतकऱ्याच्या खात्यात नुकसान भरपाई जमा केली पाहिजे.

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने स्वच्छता ही सेवा मोहीम २०२५ चा प्रारंभ केला












**सोलापूर/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या जयंतीनिमित्त त्यांना आदरांजली म्हणून देशव्यापी आयोजित स्वच्छ भारत अभियानांतर्गत १७ सप्टेंबर २०२५ रोजी ''स्वच्छता ही सेवा'' मोहिमेस २०२५ चा प्रारंभ केला.

दरवर्षी १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत साजरी होणारी स्वच्छता ही सेवा मोहीम ''संपूर्ण समाज'' आणि ''संपूर्ण सरकार'' दृष्टिकोनाचे उदाहरण देते, ज्यामुळे स्वच्छतेचा संदेश एकत्रितपणे बळकट करण्यासाठी सर्व स्तरांवर नागरिक, संस्था आणि नेतृत्व एकत्र येते.

सोलापूर, लातूर, कुर्डुवाडी, कलबुरगि, वाडी, मोहोळ, पंढरपूर रेल्वे स्थानके आणि विभागातील इतर विविध कार्यालय येथे कर्मचाऱ्यांनी स्वच्छता शपथ घेतली. यानुसार:

- स्वच्छतेसाठी वचनबद्धता आणि दरवर्षी १०० तास (आठवड्यातून २ तास) श्रमदान (स्वयंसेवी सेवा) करणे.
- कामाच्या ठिकाणी आणि घरात स्वतःचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी. यांचा समावेश करण्यात आला.
- कचरा टाकणे टाळणे आणि इतरांनी कचरा टाकू नये याची खात्री करणे.
- गावे, शहरे आणि शहरांमध्ये स्वच्छ भारत अभियानाची जागरूकता पसरवणे.
- ही प्रतिज्ञा घेण्यासाठी आणि स्वच्छ भारताच्या निर्मितीमध्ये योगदान देण्यासाठी आणखी १०० लोकांना प्रेरित करणे.

या प्रतिज्ञेनंतर, आजच अनेक कर्मचाऱ्यांनी श्रमदान उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला, ज्यामुळे मोहिमेला जोरदार सुरुवात झाली. स्वच्छता ही सेवा २०२५ मोहीम १ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सुरू राहील, ज्यामध्ये संपूर्ण विभागात स्वच्छता मोहीम, जागरूकता उपक्रम आणि नागरिकांच्या सहभागाच्या उपक्रमांची मालिका आखली जाईल.

मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग स्वच्छतेच्या राष्ट्रीय मोहिमेसाठी आपल्या समर्पणाची पुष्टी करतो आणि नागरिकांना ''स्वच्छ भारत, स्वस्थ भारत'' चे स्वप्न साकार करण्यासाठी हातभार लावण्याचे आवाहन करतो.

# आंतरराष्ट्रीय समान वेतन दिनाचे भारतीय संविधानाच्या प्रकाशात समाजशास्त्रीय चिंतन

मानव समाजाच्या इतिहासात असमानता ही जणू अपरिहार्य छाया ठरली आहे. जाती, वंश, धर्म, भाषा अशा विविध आधारांवर भेदभाव अनुभवला गेला; मात्र या सर्वात सर्वाधिक दीर्घकाळ आणि खोलवर ठसलेला भेदभाव म्हणजे स्त्री-पुरुष असमानता होय. मानवी सभ्यता जसजशी प्रगत होत गेली तसतसे 'समता' हे मूल्य केंद्रस्थानी आले. प्राचीन काळातील वंशभेद, जातीभेद, धर्मभेद या अडथळ्यांवर मात करत समाजाने लोकशाही, मानवाधिकार, सामाजिक न्याय अशा संकल्पना रुजवल्या आहेत. मात्र आजही लिंगभावभेदाच्या स्वरूपात असमानता टिकून आहे. स्त्री आणि पुरुष या दोन अर्धांगांनी समाजाची उभारणी झाली असली तरी श्रमाचे मोल ठरवताना स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला गेला आहे. घरगुती, सामाजिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच क्षेत्रांत स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले. कालांतराने शिक्षण, लोकशाही मूल्ये, स्त्रीवादी चळवळी यामुळे परिस्थितीत बदल घडू लागला आहे. तरीदेखील समानतेच्या लढाईत 'समान कामासाठी समान वेतन' हा प्रश्न आजही निकाली लागलेला नाही. स्त्री-पुरुष दोघेही सारखे श्रम करत असले, समान जबाबदाऱ्या पार पाडत असले, तरीही वेतनाच्या बाबतीत स्त्रियांना कमी मोबदला मिळत असतो. समान कामासाठी समान वेतन हा केवळ आर्थिक मुद्दा नाही; तर तो सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि लोकशाही तत्त्वांचा गाभा आहे. या वास्तवाची जाणीव करून देण्यासाठी दरवर्षी १८ सप्टेंबर रोजी 'आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन' साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे स्त्रियांच्या हक्कांची, मानवी मूल्यांची आणि घटनात्मक तत्त्वांची आठवण करून देणारा एक जागतिक उपक्रम आहे. हा दिवस केवळ एक औपचारिकता नसून सामाजिक न्यायाच्या प्रवासात आत्मपरीक्षणाचा क्षण आहे.

भारतीय संविधान हे जगातील सर्वाधिक प्रगत लोकशाही दस्तावेजांपैकी एक मानले जाते. त्यात समतेच्या तत्त्वाला केंद्रस्थानी ठेवले आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला कायद्यापुढे समानता दिली आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद १४ मध्ये 'समानतेचा अधिकार' स्पष्टपणे नमूद केलेला असून भारतीय संविधानातील अनुच्छेद १५ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान यांच्या आधारावर भेदभावास बंदी घालतो तर अनुच्छेद १६ सार्वजनिक सेवांमध्ये किंवा नोकरीत समान संधीचे आश्वासन देतो. तसेच भारतीय संविधानातील अनुच्छेद ३९(घ) राज्याच्या धोरणनिर्देशक तत्त्वांमध्ये स्पष्टपणे नमूद करतो की पुरुष व स्त्रियांना समान कामासाठी समान वेतन दिले जावे तर अनुच्छेद ४२ कामगारांच्या मानवीय हक्कांचे रक्षण करण्याचे बंधन घालतो. संविधानातील या तरतुदींमधून घटनाकारांनी स्त्रियांच्या आर्थिक हक्कांचा विचार किती गांभीर्याने केला होता हे स्पष्ट होते. या तरतुदींमधूनच हे स्पष्ट होते की समता ही आपल्या लोकशाहीचा पाया आहे. मात्र या हमींचे प्रत्यक्षातले चित्र पाहिले तर असमानता अनेक स्तरांवर पसरलेली असून घटनात्मक आश्वासन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये मोठी दरी आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास समान वेतनाचा प्रश्न हा केवळ कायदेशीर तरतुदींचा किंवा कामगार धोरणांचा नाही, तर तो सत्ता-संरचनेशी जोडलेला आहे. शतकानुशतकं पितृसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना घरगुती जबाबदाऱ्यांपुरते मर्यादित केले गेले आहे. बालसंगोपन, घरकाम, वृद्धांची देखभाल या कामांना आर्थिक मूल्यच दिले गेले नाही. त्यामुळे स्त्रीच्या श्रमाचे अवमूल्यन झाले आहे. ही मानसिकता आजही कायम आहे. स्त्रिया कामाच्या ठिकाणी गेल्या तरी त्यांचे योगदान दुय्यम मानले जाते. परिणामी स्त्रियांच्या श्रमांना 'अदृश्य काम' अशी ओळख मिळाली. त्या घराबाहेर कामासाठी गेल्या तरी त्यांचे योगदान दुय्यम मानले गेले. यामुळेच ग्रामीण भागातील शेतमजुरी असो किंवा शहरी भागातील कॉर्पोरेट क्षेत्रातील नोकरी असो, सर्व स्तरांवर स्त्रियांना कमी वेतन दिले जाते.

भारतातील ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रात स्त्रिया वीटभट्टी, बांधकाम, शेतमजुरी, मोलमजुरी, घरकाम या क्षेत्रांत काम करतात. त्यांना पुरुषांच्या तुलनेत कमी मजुरी मिळते. शहरी भागातील शिक्षण घेतलेल्या स्त्रिया उद्योगधंद्यात, प्रशासनात, आयटी कंपन्यांत कार्यरत आहेत; तरीही त्यांचे वेतन पुरुषांच्या तुलनेत कमी असते. या विषमतेला 'जेंडर पे गॅप' असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालानुसार भारतातील स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत सरासरी २७ टक्क्यांनी कमी वेतन मिळते. असंघटित क्षेत्रात ही दरी आणखी मोठी आहे. जागतिक संदर्भात पाहिले तरी परिस्थिती फारशी वेगळी नसून हा प्रश्न गंभीर आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'यूएन विमेन' अहवालानुसार जगभरातील स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत सरासरी २० टक्के कमी वेतन मिळते. काही प्रगत देशांनी यावर मात करण्यासाठी कठोर उपाययोजना केल्या आहेत. आइसलँडने २०१८ पासून प्रत्येक कंपनीला समान वेतनाचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक केले आहे. स्वीडन, नॉर्वे, फिनलंड यांसारख्या देशांत वेतन संरचना पारदर्शक ठेवली जाते. त्याच्या तुलनेत भारतात १९७६ मध्ये 'समान वेतन कायदा' करण्यात आला तसेच २०१९ मध्ये 'वेतन संहिता' लागू करण्यात आली. पण अंमलबजावणीच्या बाबतीत मर्यादा आहेत. तपासणी यंत्रणा कमी, महिलांच्या हक्कांविषयी जागरूकतेचा अभाव आणि असंघटित क्षेत्राची व्याप्ती मोठी असल्यामुळे कायद्यांचा परिणाम अपेक्षेइतका झाला नाही.

भारतीय न्यायव्यवस्थेने मात्र 'समान कामासाठी समान वेतन' हा घटनात्मक तत्त्वांचा भाग असल्याचे ठामपणे मांडले आहे. रणधीर सिंग विरुद्ध भारत संघ (१९८२) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की लिंगाच्या आधारावर वेतनात भेदभाव करणे हा घटनात्मक अधिकारांचा भंग आहे. इतर अनेक खटल्यांतही न्यायालयांनी स्त्रियांना समान वेतनाचा अधिकार दिला. पण प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी अद्यापही अदृश्य अडथळे दिसून येतात. स्त्रियांना एका विशिष्ट पातळीपलीकडे बढती मिळत नाही, निर्णयक्षम पदांवर त्यांना पोहोचता येत नाही. हे आर्थिक आणि सामाजिक दोन्ही स्तरांवर अन्यायकारक असून त्यामुळे आर्थिक व सामाजिक सत्तेतील असमानता अधिक गडद होते.

समान वेतनाची अंमलबजावणी केल्यास त्याचे परिणाम केवळ स्त्रियांसाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठी सकारात्मक होतात. महिलांना योग्य मोबदला मिळाल्यास त्यांची आर्थिक स्थिती मजबूत होऊन कुटुंब आर्थिकदृष्ट्या सक्षम होते. घरगुती निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढतो. मुलांच्या शिक्षणावर, आरोग्यावर अधिक खर्च होतो. लवकर लग्न, हुंडा यांसारख्या प्रथा कमी होतात. मुलींचे शिक्षण वाढते आणि पुढील पिढ्या सबलीकरणाच्या दिशेने वाटचाल करतात. आर्थिकदृष्ट्या सक्षम महिला समाजातील लोकशाही प्रक्रियेतही सक्रियपणे सहभागी होतात. त्यामुळे समान वेतन हा मुद्दा राष्ट्राच्या एकूण विकासाशी निगडित असून त्यामुळे राष्ट्राच्या विकासाला गती मिळते.



समाजशास्त्र सांगते की असमानतेविरुद्धची लढाई केवळ कायद्यांनी जिंकता येत नाही तर त्यासाठी प्रथम मानसिकता बदलणे गरजेचे आहे. समाजशास्त्राच्या दृष्टीने या समस्येचे निराकरण करण्यासाठी बहुआयामी उपायांची गरज आहे. शाळा-महाविद्यालयांमध्ये लिंगभाव समानतेचे मूल्य शिकवले गेले पाहिजे. माध्यमांनी स्त्रियांची प्रतिमा आदरपूर्वक आणि वास्तवदर्शी मांडली किंवा दाखवली पाहिजे. नियोक्त्यांनी वेतन संरचना पारदर्शक ठेवली पाहिजे. सरकारने वेतन संहितेची कठोर अंमलबजावणी केली पाहिजे. असंघटित क्षेत्रातील कामगारांना किमान वेतनाची हमी देण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारली पाहिजे. तसेच महिलांनी संघटित होऊन आपले हक्क मागितले पाहिजेत.

भारतीय संविधान हा आपल्या लोकशाहीचा कणा आहे. समता ही त्याची आत्मा असून 'समता' हे मूल्य घराघरात पोहोचले पाहिजे. स्त्री-पुरुष समानतेशिवाय लोकशाही अपूर्ण आहे. आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन आपल्याला याचीच जाणीव करून देतो. आज भारत डिजिटल इंडिया, आत्मनिर्भर भारत, स्टार्टअप इंडिया यांसारख्या मोहिमा राबवतो आहे. पण या योजनांचा खरा यशस्वी परिणाम घडवायचा असेल तर स्त्रियांचा सक्रिय सहभाग आणि त्यांना न्याय्य मोबदला मिळणे अपरिहार्य आहे. समान वेतनाशिवाय विकास केवळ अर्धवट ठरेल.

शेवटी एवढेच म्हणता येईल की, समान वेतन हा आर्थिक मुद्दा नसून सामाजिक न्याय, मानवी प्रतिष्ठा आणि घटनात्मक समतेचा प्रश्न आहे. आंतरराष्ट्रीय समान वेतन दिन हा स्त्री-पुरुष समतेच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. तो आपल्याला स्मरण करून देतो की खरी लोकशाही आणि खरी प्रगती तेव्हाच साध्य होईल जेव्हा स्त्री-पुरुषांना समान श्रमासाठी समान मोबदला मिळेल. ही जबाबदारी केवळ सरकारची किंवा न्यायालयांची नसून संपूर्ण समाजाची आहे. स्त्री-पुरुष समतेचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येकाला आपला वाटा उचलावा लागेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२**

# खांद्यावरचा तीळ: एआयचा अंदाज की वास्तव?

आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या कल्पनाशक्तीच्या पलीकडचं काम करत आहे. फोटो एडिटिंग, कपडे बदलणे, चेहऱ्याचे भाव सुधारणा किंवा अगदी नवी प्रतिमा निर्माण करणे एआयमुळे हे सारे प्रयोग सहज शक्य झाले आहेत. पण, या प्रक्रियेत अनेकदा काही अशा गोष्टी दिसतात, ज्या मूळ प्रतिमेत नसतात. ''फोटो एआयने बदलतो, पण काहीवेळा वास्तवाहून अधिक वास्तव दाखवतो'' हे प्रश्नांकित वाक्य आज अनेक विचारवंतांच्या मनात घर करून आहे. याच वाक्यावर आधारित एका घटनेचा शोध घेऊया, जिथे एका फोटोमध्ये अचानक दिसलेल्या खांद्यावरील तिळाने आपल्याला एआयच्या सामर्थ्याबद्दल आणि मर्यादांबद्दल विचार करण्यास भाग पाडले.

आजच्या डिजिटल युगात, कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या कल्पनाशक्तीच्या पलीकडचं काम करत आहे. फोटो एडिटिंग, कपडे बदलणे, चेहऱ्याचे भाव सुधारणे किंवा अगदी नवी प्रतिमा निर्माण करणेएआयमुळे हे सारे प्रयोग सहज शक्य झाले आहेत. पण, या प्रक्रियेत अनेकदा काही अशा गोष्टी दिसतात, ज्या मूळ प्रतिमेत नसतात. ''फोटो एआयने बदलतो पण काहीवेळा वास्तवाहून अधिक वास्तव दाखवतो'' हे प्रश्नांकित वाक्य आज अनेक विचारवंतांच्या मनात घर करून आहे.

एआयने तयार केलेला फोटो आणि खांद्यावरचा तीळ





अलीकडेच एका तरुणीचा फोटो ड्रेसमधून साडीत बदलण्यात आला. मूळ फोटोमध्ये तिचा खांदा झाकलेला होता, पण एआयने तयार केलेल्या प्रतिमेत तिच्या खांद्यावर एक तीळ दिसला. यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण झालाएआयला तो तीळ कसा ''कळला''?

खरं तर, एआयला कोणत्याही गोष्टीचं थेट वास्तव माहीत नसतं. ते लाखो प्रतिमांमधून शिकलेले पॅटर्न वापरून कल्पनेवर आधारित नवा फोटो तयार करतं. खांदा, मान किंवा हातावर तीळ असणं हे सामान्य असल्यामुळे, शरीराचा लपलेला भाग दाखवताना ते सरसकट अशा खुणा तयार करतं. त्यामुळे, हे तपशील कल्पनेतून निर्माण झालेले असतात, प्रत्यक्षातील नाहीत.

जनरेटिव्ह फिल्स आणि प्रॉबॅबिलिटी

एआयच्या या प्रक्रियेला तांत्रिक भाषेत जनरेटिव्ह फिल्स असं म्हणतात. जेव्हा एखादा भाग अस्पष्ट किंवा अपूर्ण असतो, तेव्हा एआय आपल्या डेटाबेसमध्ये असलेल्या माहितीच्या आधारावर तो भाग पूर्ण करतो. एआयचा अल्गोरिदम लाखो माणसांच्या प्रतिमांचा अभ्यास करून हे शिकतो की मानवी त्वचेवर तीळ, सुरकुत्या किंवा डाग असणे ही एक सामान्य गोष्ट आहे. त्यामुळे, तो ''प्रॉबॅबिलिटी'' म्हणजेच शक्यता वापरून प्रतिमा निर्माण करतो.

एआयला हे माहीत नसतं की मूळ व्यक्तीला तीळ आहे की नाही. तो फक्त सर्वात संभाव्य आणि नैसर्गिक वाटेल असा तपशील तयार करतो. अनेकदा, या प्रक्रियेत एआय हॅल्युसिनेशन किंवा आर्टिफॅक्ट्स तयार करतं. हाताला जादा बोटं दिसणं, चेहऱ्याची दिशा बदलणं, किंवा नवनवीन डिझाइन्स तयार होणं, हे सगळे याच प्रकाराचे नमुने आहेत.

एआय विरुद्ध वास्तव: कोणता अनुभव खरा?

एआयने निर्माण केलेला हा अंदाज आणि मानवी डोळ्यांनी पाहिलेला अनुभव यात मोठा फरक असतो. एआयचा अंदाज हा फक्त आभासी असतो, पण काहीवेळा तो वास्तवाशी इतका जुळतो की आपल्याला गोंधळात पाडतो. एका दृष्टीने, एआयने दाखवलेला तीळ हा केवळ एक भ्रम असतो, पण तो भ्रम इतका खरा वाटतो की आपण त्यावर विश्वास ठेवू लागतो.


यामुळे समाजात काही मोठे प्रश्न निर्माण होतात. जेव्हा एआय न दिसणाऱ्या खुणा किंवा तपशील एखाद्या व्यक्तीच्या फोटोत जोडते, तेव्हा व्यक्तीच्या खासगीपणाचा (घ्द्वत्ध्ठ्ठड़न्न) प्रश्न निर्माण होतो. एआयच्या या क्षमतेमुळे विश्वासार्हता आणि असत्य यातील सीमारेषा अस्पष्ट होते. सोशल मीडियावर एआय फोटोमधील एका लहानशा गोष्टीचाही मोठा परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे गैरसमज निर्माण होण्याची शक्यता वाढते.

तज्ज्ञांचे मत आणि निष्कर्ष

फोटोग्राफी आणि तंत्रज्ञान तज्ज्ञांच्या मते, एआय फोटो हे कलात्मक निर्मिती आहेत, वास्तवाचे दस्तावेज नाहीत. एआयची निर्मिती ही अनेक प्रतिमांच्या माहितीवर आधारित असते. ही निर्मिती सुंदर आणि आकर्षक असली, तरी तिला वास्तवाचा आधार नाही. एआयने दाखवलेला तीळ हा खऱ्या व्यक्तीचा तपशील नसून, डेटावरून लावलेला एक अंदाज आहे.

एआयचं सामर्थ्य मोठं असलं तरी त्याच्या कल्पना कधी कधी भ्रामक आणि गोंधळवणाऱ्या ठरतात. त्यामुळे, एआय-निर्मित प्रतिमा पाहताना वास्तव आणि आभास यातील फरक समजून घेणं आवश्यक आहे. ''आपण पाहतो ते खरे आहे की एआयचा भास?'' हा प्रश्न आजही खुला आहे. एआयचा वापर करताना सजगता आणि शहाणपण बाळगणं गरजेचं आहे, कारण तंत्रज्ञानाने तयार केलेला आभास कधीकधी वास्तवाहून अधिक आकर्षक वाटतो.

**राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**मोबाईल - ९८९०५७७१२८**



# समान भावाने सेवा

एका वेळची गोष्ट आहे. ईश्वरचंद विद्यासागर यांच्याजवळ त्यांच्या मित्राचा एक नोकर काही कामानिमित्त आला. विद्यासागर बाहेर आले आणि त्यांनी पाहिले तर घराच्या खाली एक वयस्कर व्यक्ती उभा होता. आणि तो खूप थकलेला होता. अशा स्थितीत तो वरती येण्यास असमर्थ होता. हे पाहून विद्यासागर त्या व्यक्तीसाठी पिण्यास पाणी घेऊन आले आणि परत जाऊन पंखा घेऊन आले आणि स्वत: हवा मारु लागले. विद्यासागरना असे करताना पाहून त्यांचा मित्र म्हणाला ज्या व्यक्तीस आपण पाणी पाजत आहात आणि पंख्याने हवा मारत आहात तो एक सामान्य सेवक आहे. मित्राचे हे बोलणे ऐकून विद्यासागर म्हणाले ठीक आहे, हा एक सेवक आहे, परंतु माणूसच आहे.


यावरुन विद्यासागर यांनी मित्राला आपल्या लहानपणीची एक गोष्ट सांगितली, माझे वडील एकदा बाजारात चक्कर येऊन पडले. तेथे चन्ना विकणाऱ्या एका व्यक्तीने आपले काम सोडून ताबडतोब पाणी आणले आणि त्याचा शिडकावा मारला आणि नंतर पंखा आणून त्याने हवाही मारु लागला, असे करत असताना तो आपले सामानही विसरुन गेला. त्याला केवळ माझ्या वडिलांची चिंता होती. थोड्याच वेळात जेव्हा माझे वडील उठून बसले. तेव्हा त्यांनी त्या व्यक्तीचे आभार मानले. या घटनेमुळे मी एवढा प्रभावित झालो की, त्यानंतर कोणत्याही व्यक्तीची मदत करणे आपला धर्म मानला. शेवटी माझ्यासाठी ही गोष्ट कोणतेच बंधन ठेवत नाही की, कोणी व्यक्ती उच्च जातीचा आहे की, खालच्या जातीचा आहे. छोटा असो व मोठा मी सर्वांना समान समजतो. आणि त्यांची समान भावानेच सेवा करतो.

## वजन घटवण्यासाठी आणि उत्तम आरोग्यासाठी दही एक उत्तम पर्याय



आहे. पण अनेकदा प्रश्न पडतो की दही दिवसा खाणे फायदेशीर आहे की रात्री? या लेखात याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली आहे.सकाळची वेळ:सकाळी नाश्त्यात दही खाणे उत्तम मानले जाते. यामुळे दिवसभर शरीराला ऊर्जा मिळते. सकाळी दही खाल्ल्याने चयापचय (ाशींरलेश्रळीा) क्रिया सुधारते, ज्यामुळे अन्न पचनास मदत होते. सकाळी दही खाल्ल्याने दिवसभर पोट भरलेले राहते आणि अनावश्यक खाण्याची सवय कमी होते.रात्रीची वेळ:आयुर्वेदानुसार, रात्री दही खाणे टाळावे, कारण यामुळे सर्दी-खोकला आणि कफचा त्रास होऊ शकतो. रात्रीच्या वेळी दही पचनास जड असते, ज्यामुळे पचनक्रिया मंदावते. मात्र, काही आहारतज्ज्ञांच्या मते, जर तुम्हाला दही खायची सवय असेल तर तुम्ही कमी प्रमाणात आणि जेवणानंतर लगेचच

# यंदा नवरात्र ९ दिवसांची नव्हे तर १० दिवसांची!



यंदा नवरात्र ९ दिवसांची नव्हे तर १० दिवसांची! जाणून घ्या खास कारण दरवर्षी शारदीय नवरात्र भक्तिपूर्ण वातावरणात साजरी केली जाते. संपूर्ण नऊ दिवस भक्त दुर्गा देवीचे उपास करतात, आईच्या नऊ रूपांची विधीपूर्वक पूजा करतात आणि दहाव्या दिवशी विजयादशमीचा उत्सव साजरा करतात. मात्र, २०२५ सालातील शारदीय नवरात्र काही विशेष ठरली आहे. यंदा नवरात्र फक्त नऊ दिवसांची न राहता पूर्ण १० दिवसांची साजरी केली जाणार आहे. पंचांगानुसार, शारदीय नवरात्र २२ सप्टेंबर २०२५ पासून सुरू होईल आणि २ ऑक्टोबर २०२५ रोजी दुर्गा विसर्जनासह विजयादशमी साजरी केली जाईल. या वर्षी तृतीया तिथी दोन दिवस टिकल्यामुळे हा १० दिवसांचा नवरात्र योग निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे ही तिथी २४ आणि २५ सप्टेंबर दरम्यान असेल, ज्यामुळे भक्तांसाठी ही नवरात्र अधिक महत्त्व-पूर्ण आणि शुभ ठरली आहे.

फेसबुक आणि यूट्युब बंदी विरोधात नेपाळची तरुण पिढी रस्त्यावर, १८ जणांचा मृत्यू

काठमांडू : अफवा आणि खोट्या बातम्या मोठ्या प्रमाणात वेगाने पसरवण्यासाठी सोशल मीडियाचा गैरवापर केला जातो. हे कारण देत नेपाळ सरकारने फेसबुक, यूट्युबसह

कन्या पूजन, भंडारा आणि हवनसह नवरात्राचा शुभ समारोप


या वर्षी महानवमी १ ऑक्टोबर २०२५ रोजी येणार आहे. या दिवशी दुर्गेच्या शेवटच्या रूप, माँ सिद्धिदात्री यांची विधीपूर्वक पूजा केली जाईल. नवरात्राच्या शेवटच्या दिवशी कन्या पूजन, भंडारा आणि हवन यासारखे धार्मिक विधी पार पाडले जातील, जे भक्तांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जातात. शास्त्रानुसार, तिथींची वाढ होणे अत्यंत शुभ मानले जाते, तर तिथी कमी होणे अशुभ लक्षण समजले जाते. यंदाच्या नवरात्रीत तृतीया तिथीची वाढ होणे हे एक सकारात्मक संकेत आहे. ज्योतिषशास्त्रानुसार, याचा अर्थ असा की येणारा काळ समृद्धी, आनंद आणि सकारात्मक उर्जा घेऊन येणार आहे, जो देश आणि जगासाठीही शुभ ठरेल. या दिवशी भक्तांच्या जीवनात आनंद, संपन्नता आणि सौभाग्याची भरभराट होण्याची अपेक्षा आहे.

माता राणीची हत्तीवर स्वार सवारी

नवरात्राच्या पावन काळात माता राणीची सवारी खूप महत्वाची मानली जाते. माता दुर्गेची सवारी तिच्या आगमन आणि प्रस्थानाच्या दिवसांनुसार निश्चित केली जाते. या वर्षी माता दुर्गे हत्तीवर स्वार होऊन येत आहेत, ज्याला अत्यंत शुभ मानले जाते. हत्ती हा ज्ञान, समृद्धी आणि शांती यांचा प्रतीक आहे, त्यामुळे माता राणीचं हत्तीवर आगमन समाजात सुख, संपन्नता आणि ज्ञानाची भरभराट दर्शवते. भक्तांसाठी हे दृश्य अत्यंत पवित्र मानले जाते आणि त्याला सामोरे जाणे ही एक अद्भुत धार्मिक अनुभूती असते.नवरात्रीच्या १० दिवसांचे महत्त्व काय आहे?नवरात्राचे १० दिवसांचे महत्त्व भक्तांसाठी अतिशय खास आहे. या वर्षी, नवरात्र फक्त ९ दिवसांची नाही तर पूर्ण १० दिवसांची असल्यामुळे भक्तांना माँ दुर्गे ची पूजा आणि प्रार्थना करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळणार आहे. यामुळे भाविकांना त्यांची भक्ती अधिक दृढ करण्याची संधी मिळेल. नवरात्राच्या प्रत्येक दिवशी माँ दुर्गेच्या वेगवेगळ्या रूपांची पूजा करण्याबरोबरच, दहाव्या दिवशी विजयादशमीसाठी आईचे आशीर्वादही मिळतील. हा अद्भुत योगायोग भक्तांसाठी अत्यंत पवित्र आणि शुभ मानला जातो, ज्यामुळे त्यांचे जीवन आनंद, समृद्धी आणि सकारात्मकतेने भरून जाते.

# शांततेची आशा





नेपाळ छोटा देश असला तरी अनेक समस्यांनी तो गांजला आहे. भ्रष्टाचार व बेरोजगारी या मागे ढासळलेली अर्थव्यवस्था हे मुख्य दुखणे आहे. सुशीला कार्की यांना अनेक आघाड्यांवर लढावे लागेल हे स्पष्ट आहे.

नेपाळमधील राजकीय नेतृत्वाची पोकळी तूर्त भरून काढण्यात आली आहे. देशाच्या माजी सरन्यायाधीश सुशीला कार्की हंगामी पंतप्रधान बनल्या आहेत. आंदोलक युवकांनी त्यांच्या नावास संमती दिल्यानंतर कार्की यांचे नाव निश्चित करण्यात आले. त्या नेपाळच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या आहेत. त्या पदावर त्या सहा महिने राहतील, मग निवडणूक घेतली जाईल. अध्यक्ष रामचंद्र पोडेल यांनी कार्की यांना पद व गुप्ततेची शपथ देवविली. नेपाळचे लोकप्रतिनिधी गृह बरखास्त केल्याचेही पोडेल यांनी घोषित केले. कार्की यांनी हंगामी मंत्रिमंडळाची जुळवाजुळव केली आहे. त्यांच्या शपथविधीनंतर देशात कोठेही हिंसक घटना घडल्याचे वृत्त आले नाही. सर्व घटकांचा त्यांना पाठिंबा आहे असे त्यावरून मानता येते. गेल्या आठवड्यात माजी पंतप्रधान के.पी. शर्मा ओली यांनी समाज माध्यमांवर बंदी घातल्याने नेपाळमध्ये हिंसक उद्रेक झाला. आता तेथे 'डिस्कॉर्ड' नामक मोफत मोबाइल ॲप उपलब्ध आहे. त्यावरून सुशीला कार्की यांना मोठा पाठिंबा मिळाल्याचे वृत्त आहे. नेपाळच्या घटनेनुसार पंतप्रधान पदी येणारी व्यक्ती लोकप्रतिनिधी गृहाची सदस्य असणे आवश्यक आहे; मात्र कार्की यांची नियुक्ती 'गरज' या तत्त्वाच्या आधारे करण्यात आली. त्यांचे स्वभाव वैशिष्ट्य पाहता नेपाळला त्यांची जास्त गरज आहे.

सुव्यवस्थेचे आव्हान

नेपाळमध्ये उसळलेला हिंसाचार जरी कमी काळ टिकला असला तरी त्याची तीव्रता मोठी होती. हिंसक घटना आणि पोलिसांची किंवा लष्कराची कारवाई यात ५१ जण ठार झाल्याचे अधिकृतरीत्या सांगण्यात येत आहे. त्यात काही भारतीयांचाही समावेश आहे. देशात कायदा व सुव्यवस्था पुन्हा प्रस्थापित करण्याचे मोठे आव्हान कार्की यांच्या समोर आहे. त्यांच्या छोट्या कार्यकाळात नेपाळचे भारताबरोबरचे संबंध सुधारण्याची शक्यता व आशा आहे. माजी पंतप्रधान ओली यांची चीनशी असलेली जवळीक सर्वज्ञात आहे. कार्की यांची त्यांच्या तटस्थपणाबद्दल ख्याती आहे. त्यांचे शिक्षण बनारस हिंदु विद्यापीठात झाल्याने त्यांना भारताबद्दल आस्था आहे. त्यांनी येथूनच राज्य शास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी घेतली. नेपाळी काँग्रेसचे एक युवा नेते दुर्गा प्रसाद सुबेदी हेही त्यावेळी त्याच विद्यापीठात शिक्षण घेत होते. नंतर कार्की यांचा सुबेदी यांच्याशी विवाह झाला. नेपाळचे तत्कालीन राजे महेंद्र यांना नेपाळी काँग्रेसचा विरोध होता. कार्की यांनी नेपाळच्या न्याय यंत्रणेत बराच काळ काम केले. देशाच्या त्या पहिल्या सर न्यायाधीशही बनल्या. त्या पदावर त्या जेमतेम एक वर्ष होत्या. भ्रष्टाचार व त्यातही सरकारी पातळीवर होणारा भ्रष्टाचार या विरुद्ध ठाम भूमिका घेण्याबद्दलही कार्की प्रसिद्ध आहेत. याच कारणावरून त्यांनी एका मंत्र्यास तुरुंगवासाची शिक्षा सुना-वली होती. सत्ताधार्यांनी त्यांच्याविरुद्ध महाभियोग चालवण्याची तयारी केली होती; मात्र जनता कार्की यांच्या बाजूने उभी होती. त्यामुळे तो प्रस्ताव रद्द करावा लागला होता; मात्र या प्रकाराने व्यथित होऊन त्यांनी पदत्याग केला होता; मात्र त्यांच्या विचारांत व भूमिकेत बदल झा-लेला नाही. उच्च पातळीवरील भ्रष्टाचार व आंदोलन काबूत आणण्यासाठी पोलिसांनी केलेला बळाचा वापर याची न्याय्य चौकशी करण्याचे स्वातंत्र्य असेल, तरच आपण हंगामी सरकारचे प्रमुखपद स्वीकारू असे त्यांनी पोडेल यांना स्पष्ट केले होते. लोकप्रतिनिधीगृह बरखास्त करण्याबाबतही त्यांनीच आग्रह धरला होता. सत्तेत असलेल्या व्यक्तींविरुद्ध कारवाई करणे जड गेले असते हा विचार त्यामागे असेल. उच्च पदस्थांचा भ्रष्टाचार व बेरोजगारी ही तेथील युवकांच्या संतापाची मूळ कारणे आ-हेत. भ्रष्टाचारामुळेच तेथे अमली पदार्थांचा चोरटा व्यापार बोकाळला आहे. संसद व सर्वोच्च न्यायालयाच्या इमारती पुन्हा उभ्या करण्यापेक्षाही त्या संस्थांबद्दल जनतेत विश्वास निर्माण करणे यास कार्की यांना प्राथमिकता द्यावी लागेल. त्या स्वत:स भारताच्या मित्र म्हणवतात. चीनला ते फार रुचेल असे नाही. भारताने कार्की यांचे स्वागत केले असले तरी चीनने प्रतिक्रिया दिलेली नाही. कार्की नेपाळमध्ये शांतता स्थापन करतील, अशी आशा आहे.

## वैवाहिक जीवनासाठी काही टिप्स

## डॉक्टर टीप्स



डाळींबाचा रसही फायद्याचा ठरतो. सफरचंद खाल्ल्यानं अशक्तपणा दूर होतो. तुळशीपत्र खाल्ल्यानं शरीरातील हिमोग्लोबीन संतुलित राहायला मदत होते. मध अनेक आजारांवर रामबाण उपाय आहे. ते एखाद्या औषधासारखं काम करतं. ॲनिमिया झालेल्या लोकांनी मधातील लोहासाठी त्याचं नियमित सेवन करावं. पालकाची भाजी अशक्तपणा घालवते. त्यामुळे त्याचा आहारात समावेश करावा. यात कॅल्शियम, अ, ई आणि बी ९ जीवसत्त्व आणि बिटा केरॉटिन असतं. अर्धा कप उकळलेल्या पालकात ३.२ मिलिग्रॅम लोह मिळतं.हाडं आणि स्नायूंमधील दुखण्यासाठी ड जीवनसत्त्व महत्त्वाची भूमिका बजावतं. अलीकडच्या काळात स्नायूंचं दुखणं ही तरुणाईसमोरची मोठी समस्या ठरली आहे. त्याचं कारण म्हणजे ड जीवनसत्त्वाची कमतरता. शहरी भागात राहणारे ८० ते ९० टक्के लोक ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या त्रासांनी ग्रस्त आहेत. ड जीवनसत्त्वाच्या कमतरतेनं हार्मोनमध्ये कमी निर्माण होते.




## विनोद

**वनोद**

**सुंदर : आई मी पोहायला जाऊ का?**
**आई : नको पाणी खोल आहे व लाटाही जास्त आ-हेत.**
**सुंदर : पण बाबा पोहतात त्याचे काय?**
**आई : त्यांचा विमा**

## संदेश

Santa: Do you know the full form of MBA?
Banta: No santa.
Santa: MBA means "Mai Bhi Anna"

## सुविचार



खोबरे पाहिजे असेल तर नारळ फोडलाच पाहिजे.


– जे. ग्रॅंज

### संस्कृत सुभाषित

**हंस: श्वेतो बक: श्वेत: को भेदो बकहंसयो:। नीरक्षीरविवेके तु हंसो हंसो बको बक:।।**

**अर्थ –** हंसही शुभ्र आणि बगळाही शुभ्रच. पण हंस आणि बगळा यात फरक तो काय? पाणी आणि दूध वेगळे करताना हंस आणि बगळा यांच्यातील भेद आप-ोआप समजतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. प्रणी, पशू
४. अग्रलेख
९. पहारा करणारा
११. प्रचंड, तीव्र
१३. नजरफेक
१६. गालबोट
१७. मौज करणे
१८. बादशहाचा प्रधान
२०. सबब
२१. नूतन
२२. मृत्तिका, मृदा
२३. निरर्थक
२४. शृंखला
२६. कर्ण
२८. जास्तीत जास्त
२९. हाताचा तळवा
३२. दिखाऊ, वरपांगी
३४. अवघा, सगळा
३६. गार, थंड
३७. प्रत्येक ठिकाणी
३८. दूर गेलेला
३९. टक, दृष्टी
४२. दोस्त
४३. अंत:करण
४४. जाणकार
४६. तासाचे प्रमाण
४७. अथवा
४८. युवती
५०. जानकी
५१. आजार, रोग
५५. विजार
५७. परिस्थिती
५८. पंजातील बिननावाचे बोट
५९. मूळ आधार
६०. आजच्या आधीचा दिवस
६१. गोव्यातील दैवत
६२. हालचालीवरील नजर
६४. गवत, गुरांचे खाद्य
६६. बस्तान
६७. शहर, गाव
६९. स्वच्छ, चकचकीत
७१. श्रीमंत
७२. दरी
७३. बासरी
७४. उद्याच्या नंतरचा दिवस
७७. वृक्ष
७८. किरकोळ सामान
७९. जयाचा नामघोष

## उभे शब्द

१. तरूण, सैनिक
२. भार
३. रावणाच्या तोंडांची संख्या
४. संकटाच्या वेळी
५. मोदकाचे आवरण
६. नवरा
७. संकटातून निभावणे
८. मित्राचे सोंग घेतलेला शत्रू
९. गोव्याची राजधानी
१०. माती, वाळू
१२. चांगला
१४. योग्य, बरोबर
१५. चोख, निर्भेळ सोने
१७. कणा
१९. एक पाताळ
२२. आईचा भाऊ
२३. ऐनवेळी कच खाणे
२५. दुष्ट
२७. नुकतेच जन्मलेले
२८. कर देण्यास योग्य
३०. रत्न
३१. भूपती
३३. अंगातील मस्ती, जोश
३५. हिंदीतील रहस्य
४०. रम्य, मनोहर
४१. भूतकाळ
४२. दाढीच्या जोडीची
४४. जननी
४५. साप्ताहिक सुट्टीचा दिवस
४६. धातूचा धागा
४९. भारतीय चलन
५०. वेस, हद्द
५२. जनावरांचे पिल्लू
५३. पोरका
५४. ठेकेदार
५६. निकट
५७. चलनवलन
५८. अगम्य
५९. बाजीप्रभूंनी लढवलेली जागा
६२. पलीकडे
६३. समशेर
६५. रक्षाबंधनाचा धागा
६६. अटीची भाषा
६८. डोंगरी किल्ला
७०. तपश्चर्या, साधना
७३. पाण्याचा प्रवाह
७५. मातीचा कण
७६. निरुपयोगी

## आडवे उत्तर

१.जनावर ४.संपादकीय ९.पहारेकरी ११.जबरदस्त १३.नयनबाण १६.तीट १७.मजा मारणे १८.वजीर २०.कारण २१.नवा २२.माती २३.अर्थहीन २४.साखळी २६.कान २८.कमाल २९.करतल ३२.वरवर ३४.सारा ३६.शीतल ३७.जाग-ोजाग ३८.पारखा ३९.नजर ४२.मित्र ४३.मन ४४.माहितगार ४६.ताशी ४७.वा ४८.तरूणी ५०.सीता ५१.विकार ५५.पायजामा ५७.हाल-हवाल ५८.अनामिका ५९.पाया ६०.काल ६१.रवळनाथ ६२.पाळत ६४.चारा ६६.जम ६७.नगर ६९.लखलखीत ७१.मालदार ७२.खिंड ७३.पावा ७४.परवा ७७.तरू ७८.सटरफटर ७९.जयजयकार

## उभे उत्तर

१.जवान २.वजन ३.दहा ४.संकटकाळी ५.पारी ६.यजमान ७.तरणे ८.अस्तनीतील निख-ारा ९.पणजी १०.रेती १२.बरवा १४.यथार्थ १५.बावनकशी १७.मणका १९.रसातल २२.मामा २३.अवसानघात २५.खल २७.नवजात २८.करपात्र ३०.रतन ३१.राजा ३३.रग ३५.राज ४०.रमणीय ४१.गतकाल ४२.मिशी ४४.माता ४५.रविवार ४६.तार ४९.रुपाया ५०.सीमा ५२.कालवड ५३.अनाथ ५४.मुकादम ५६.जवळ ५७.हालचाल ५८.अनाकलनीय ५९.पावनखिंड ६२.पात ६३.तलवार ६५.राखी ६६.जरतर ६८.गड ७०.तप ७३.पाट ७५.रज ७६.वाय



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### पाक– युएई सामना संकटात! 'करो या मरो' सामन्यात पाकिस्तान मैदानात उतरणार?

दुबई –आशिया कपमध्ये भारताविरुद्धच्या दारुण पराभवानंतर, पाकिस्तानच्या स्पर्धेतील अस्तित्वावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. भारतीय क्रिकेट संघानं हस्तांदोलन करण्यास नकार दिल्यानं संतापलेल्या पाकिस्तान क्रिकेट बोर्डानं आयसीसीकडे मॅच रेफरीला हटवण्याची मागणी केली. रेफरीनं पालन न केल्यास आशिया कपमधून माघार घेण्याची धमकीही त्यांनी दिली होती. मात्र त्यांची ही धमकी हवेतच विरली. कारण आयसीसीनं त्यांची मागणी फेटाळून लावल्यानं संघ आज यूएईविरुद्ध खेळेल. जर माघार घेण्याची धमकी देणारा पाकिस्तान आज यूएईविरुद्ध हरला तर संघ स्पर्धेतून बाहेर पडेल.करो या मरो सामना : आशिया चषकात आज एक अतिशय रोमांचक सामना अपेक्षित आहे. भारताकडून पराभूत झालेल्या पाकिस्तानचा सामना यूएईशी होईल. दोन्ही संघांसाठी हा करा किंवा मरो असा सामना आहे. हा सामना जो संघ जिंकेल तो सुपर फोरमध्ये पात्र ठरेल. पाकिस्तान आणि यूएईचे दोन सामन्यांतून दोन गुण आहेत.

***

### पाकिस्तानची हद्दच झाली: संपूर्ण टीम निघाली नकली; मानवी तस्करीचा संशय

नवी दिल्ली–आशिया चषक स्पर्धेत हस्तांदोलनाच्या मुद्यावरून वातावरण पेटलेलं असताना, फुटबॉलच्या मैदानात पाकिस्तान संघाबाबत एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. पाकिस्तानने तोतया फुटबॉल संघ पाठवल्याचा प्रकार जपानच्या निदर्शनास आला आहे. या नकली संघाला जपानने मायदेशी रवाना केलं आहे.मानवी तस्करीचा हा प्रकार असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. जपानमध्ये आयोजित फुटबॉल स्पर्धेसाठी पाकिस्तानचा संघ म्हणून एक तुकडी दाखल झाली. पण हा खरा संघ नव्हता. त्यांच्याकडची कागदपत्रं खोटी होती. ते फुटबॉलपटू असल्याचं भासवत होते. सियालकोटहून आलो असा दावा त्यांनी केला. मात्र हा सगळा प्रकार बोगस असल्याचं जपान प्रशासनाच्या लक्षात आलं.पाकिस्तानच्या फेडरल इनव्हेस्टिगेशन एजन्सीने दिलेल्या वृत्तानुसार, फुटबॉल संघ असल्याचं भासवत २२ जण सियालकोटहून जपानचा पोहोचले. जपानमधल्या विमानतळ अधिकाऱ्यांनी संशय आला.

***

### 'जर तुझी इतकी लायकी असेल...,' पाकिस्तानविरुद्ध खेळणाऱ्या सूर्यकुमार यादवला जाहीर आव्हान, 'उगाच आपलं...'

दिल्ली–पहलगाम दहशतवादी हल्ल्यामुळे संबंध ताणलेले असताना भारताने पाकिस्तानविरोधात क्रिकेट खेळू नये असा सूर असतानाही आशिया कपमध्ये भारताने सामना खेळला. भारताने पाकिस्तानवर ७ गडी आणि २५ चेंडू राखून मात केली आणि सामना जिंकला. यानंतर सूर्यकुमारने हा विजय पहलगाममधील पीडितांना आणि भारतीय लष्कर जवनांना समर्पित केला. दरम्यान या विजयानंतर आता कर्णधार सूर्यकुमार यादवला जाहीर आव्हान देण्यात आलं आहे. सूर्यकुमार यादवला आव्हान देताना त्याची लायकीच काढण्यात आली आहे. आम आदमी पक्षाचे (आप) नेते सौरभ भारद्वाज यांनी पहलगाम पीडितांना श्रद्धांजली वाहणाऱ्या भारताच्या टी–२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादववर निशाणा साधला आहे. यावेळी त्यांनी सूर्यकुमारला सामन्यातील सर्व कमाई पीडितांच्या कुटुंबियांना दान करण्याचं थेट आव्हानच दिलं आहे.

***

### पाक– युएई सामन्याआधी पाकिस्तान बोर्डाचा खळबळजनक दावा!

दिल्ली–पीसीबीचा अँडी पायक्रॉफ्टने माफी मागितल्याचा दावा पाकिस्तान बोर्डाने केलाय. यूएई आणि पाकिस्तानमधील सामना सुरू होण्यापूर्वी, पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने दावा केला आहे की मॅच रेफरी अँडी पायक्रॉफ्टने पीसीबीची माफी मागितली असल्याचे म्हटलेय.आशिया कप २०२५ ला बायकॉट करण्याची धमकी देणाऱ्या पाकिस्तानच्या संघाने मंगळवारी यूएई विरुद्ध होणाऱ्या सामन्याआधीची पत्रकार परिषद रद्द केली. अशातच प्रश्न विचारला जातोय की स्पर्धेवर बहिष्कार टाकण्याची धमकी देणारा पाकिस्तान पत्रकार परिषदेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांना घाबरला का? पाकिस्तानने भारताविरुद्ध सामना झाल्यावर धमकी दिली होती की जर आयसीसीने मॅच रेफरी अँडी पायक्रॉफ्ट यांना काढून टाकले नाही तर पाकिस्तान यूएईसोबत होणार पुढील सामना खेळणार नाही आणि स्पर्धेवर सुद्धा बहिष्कार टाकेल. पण आयसीसीने पाकिस्तानची मागणी फेटाळून लावली आणि अँडी पायक्रॉफ्टला काढून टाकण्यास नकार दिला. आयसीसीच्या या निर्णयामुळे पाकिस्तान तोंडावर पडला.

# स्मृती मन्धानाचे विक्रमी वेगवान शतक


## १८ वर्षानंतर भारतीय संघाने केली ही खास कामगिरी




**नवी दिल्ली:** भारताच्या महिला क्रिकेट संघाची स्टार फलंदाज स्मृती मन्धानाने ऑस्ट्रेलियाच्या विरोधात एकदिवसीय सामन्यात ७७ चेंडूत शतक झळकवले आहे. ऑस्ट्रेलियाच्या विरोधात वेगवान शतक झळकवणारी ती पहिली फलंदाज ठरली.भारताची स्टार फलंदाज स्मृती मन्धानाने ऑस्ट्रेलिया विरोधात वेगवान शतक झळकविण्याचा विक्रम रचला आहे.

स्मृती मन्धानाच्या विक्रमी वेगवान शतकाच्या बळावर भारतीय महिला संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्धचा दुसरा वनडे सामना जिंकला. तब्बल १८ वर्षानंतर भारतीय संघाने घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामना जिंकण्याची किमया साधली. २००७ मध्ये भारतीय संघाने घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियाला नमवलं होतं. स्मृतीच्या तडाखेबंद शतकाच्या बळावर भारतीय संघाने २९२ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरादाखल खेळताना ऑस्ट्रेलियाला १९० धावाच करता आल्या. भारतीय संघाने १०२ धावांच्या फरकाने हा सामना जिंकला.

प्रथम फलंदाजी करत असताना भारतीय क्रिकेट संघाची स्टार फलंदाज स्मृती मन्धानाने मोठा विक्रम केला आहे. मन्धानाने ऑस्ट्रेलियाच्या संघाविरोधात सर्वात वेगवान शतक ठोकण्याचा विक्रम केला आहे. विशेष म्हणजे, याचवर्षी राजकोट येथे आयर्लंडविरुद्ध झालेल्या सामन्यात स्मृती मन्धानाने ७० चेंडूत शतक ठोकले होते.



चंदीगढ येथील महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सामन्यात स्मृती मन्धानाने आजच्या सामन्यात ७७ चेंडूत शतक ठोकण्याची किमया साधली. तर एकूण सामन्यात तिने ९१ चेंडूत ११७ धावा केल्या. या खेळीत १४ चौकार आणि ४ षटकारांचा समावेश होता. आजच्या शतकानंतर डावखुऱ्या मन्धानाने आपल्या कारकिर्दीतील १२ वे एकदिवसीय शतक पूर्ण केले.आजच्या शतकामुळे स्मृती मन्धानाने अनेक विक्रम आपल्या नावावर केले आहेत. या वर्षात तिसरे एकदिवसीय सामन्यातील शतक झळकविल्यामुळे लागोपाठ दुसऱ्या वर्षी तीन किंवा त्यापेक्षा अधिक शतक झळकविण्याचा विक्रम मन्धानाने आपल्या नावावर केला आहे. यापूर्वी २०२४ मध्येही तिने तीन शतक केले होते.महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके झळकविणाऱ्या खेळाडूंच्या यादीत आता संयुक्तपणे मन्धाना तिसऱ्या स्थानावर आहे. इंग्लंडची फलंदाज टॅमी ब्यूमोंट (१२ शतके) हीची बरोबरी तिने केली आहे. महिला एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकांचा विक्रम ऑस्ट्रेलियाची माजी कर्णधार मेग लॅनिंग हिच्या नावावार आहे. तिने १५ शतके झळकवली आहेत. तर न्यूझीलंडची क्रिकेटपटू सुझी बेट्सने १३ शतके केलेली आहेत.ऑस्ट्रेलियाविरोधातील दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात प्रथम फलंदाजी करत असताना भारतीय महिला फलंदाजांनी ४९.५ षटकात सर्वबाद २९२ धावा केल्या. स्मृती मन्धानाच्या (११७) खेळीसह दीप्ती शर्मा (४०), रिचा घोष (२९), स्नेह राणा (२४) आणि प्रतीका रावल (२५) यांनीही आपल्यापरीने योगदान दिले.

भारतीय संघाच्या शिस्तबद्ध गोलंदाजीसमोर ऑस्ट्रेलियाने शरणागती पत्करली. अनाबेल सदरलँडने ४५ तर एलिसा पेरीने ४४ धावांची खेळी केली. क्रांती गौडने ३ तर दीप्ती शर्माने २ विकेट्स पटकावल्या. स्मृतीला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.

## पाकिस्तानच्या खोट्या फुटबॉल संघाचा जपानमध्ये पर्दाफाश




इस्लामाबाद–एका फुटबॉल स्पर्धेत भाग घेण्यासाठी जपानमध्ये गेलेल्या पाकिस्तानच्या 'बनावट' फुटबॉल संघाला जपानी अधिकाऱ्यांनी विमान–तळावरच ताब्यात घेतले. कागदपत्रांच्या तपासणीनंतर हा संघ मानवी तस्करीचा भाग असल्याचे समोर आले आहे, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानची मोठी बदनामी झाली आहे.

काय आहे प्रकरण?

पाकिस्तानच्या सियालकोटमधून २२ जणांचा एक गट जपानला गेला होता. या गटाने आपण पाकिस्तानी फुटबॉल संघाचे खे–ळाडू असल्याचे भासवले होते. त्यांच्याकडे पाकिस्तान फुटबॉल फेडरेशनशी संबंधित कागदपत्रे आणि परराष्ट्र मंत्रालयाची बनावट 'ना हरकत प्रमाणपत्रे' (ऱ्ध्ण) देखील होती. परंतु, जपानमधील विमानतळ अधिकाऱ्यांना त्यांच्यावर संशय आला आणि त्यांनी त्यांची सखोल चौकशी केली. या चौकशीत ते खरे खे–ळाडू नसून मानवी तस्करीचा बळी ठरलेले नागरिक असल्याचे उघड झाले.

या घटनेनंतर पाकिस्तानच्या फेडरल इन्व्हेस्टिगेशन एजन्सीने तपास सुरू केला. तपासात मलिक वकास नावाच्या एका व्यक्तीला या मानवी तस्करीचा मुख्य सूत्रधार म्हणून अटक करण्यात आली आहे. त्याने 'गोल्डन फुटबॉल ट्रायल' नावाचा एक बनावट फुटबॉल क्लब सुरू केला होता. जपानला जाण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून त्याने ४० ते ४५ लाख रुपये घेतले होते.

जपानी अधिकाऱ्यांनी या बनावट संघाला तातडीने मायदेशी परत पाठवले. ही घटना उघडकीस आल्यानंतर पाकिस्तानच्या तपास यंत्रणांनी अधिक तपास सुरू केला आहे. हा प्रकार केवळ एकट्या या संघापुरता मर्यादित नसून, याआधीही अशा प्रकारे अनेकांना विदेशात पाठवण्यात आले असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे आंतरराष्ट्रीय पा–तळीवर पाकिस्तानची पुन्हा एकदा मानहानी झाली आहे.

## दोन देशांमध्ये पहिल्यांदाच होणार द्विपक्षीय टी२०आय मालिका; २१ वर्षाचा खेळाडू कॅप्टन!

दुबलिन–आयर्लंड विरुद्ध इंग्लंड क्रिकेट संघात आजपासून तीन टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यांची मालिका सुरु होत आहे. या मालिकेतील पहिला सामना १७ सप्टेंबर दुबलिन येथील मैदानावर खेळवला जाणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार सायंकाळी ६ वाजता सुरु होईल. विशेष म्हणजे दोन्ही संघांतील ही पहिलीच द्विपक्षीय टी–२० मालिका आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्धची मालिका बरोबरीत : या मालिकेपूर्वी इंग्लंडने घरच्या मैदानावर दक्षिण आफ्रिकेवरिद्ध तीन सामन्यांची टी–२० मालिका खेळली होती, जी १–१ अशी बरोबरीत सुटली. या मालिकेतील पहिल्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने इंग्लंडचा १४ धावांनी पराभव केला होता. तर दुसऱ्या सामन्यात इंग्लंडने जबरदस्त पुनरागमन करत आफ्रिकेचा १४६ धावंच्या विक्रमी फरकाने पराभव केला. या सामन्यात इंग्लंडने सर्व विक्रम मोडत २० षटकांत ३०४ धावांचा हिमालय उभारत मालिकेत बरोबरी केली. यानंतर तिसरा आणि निर्णायक सामना पावसामुळे रद्द झाला. परिणामी ही मालिका १–१ अशी बरोबरीत सुटली.२१ वर्षीय खेळाडूला बनवलं कर्णधार : विशेष म्हणजे या मालिकेत इंग्लंडने कर्णधारपदाची जबाबदारी २१ वर्षीय अष्टपैलू जेकब बेथेलकडे सोपवली आहे. जॉस बटलरनं टी–२० संघाचं कर्णधारपद सोडल्यानंतर, हॅरी ब्रूकला मर्यादित षटकांच्या स्वरुपात इंग्लंड संघाचा कर्णधार बनवण्यात आलं आहे. मात्र त्याला या आयर्लंडविरुद्धच्या मालिकेसाठी विश्रांती देण्यात आली आहे.







जर आपण जेकब बेथेलबद्दल बोललो तर तो २१ व्या वर्षी कोणत्याही आंतरराष्ट्रीय सामन्यात इंग्लंडचं नेतृत्व करणारा सर्वात तरुण कर्णधार होण्याचा विक्रम करेल.

खेळपट्टी कशी असेल : आयर्लंड विरुद्ध इंग्लंड टी–२० मालिकेतील पहिला सामना दुबलिन इथं खेळला जाईल. हे मैदान उच्च धावसंख्येसाठी प्रसिद्ध असल्याचं म्हटलं जातं. या मैदानावर कर्णधार अनेकदा नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा प्रयत्न करतात. या मैदानाच्या इतिहासाबद्दल बोलायचं झालं तर, इथं एकूण २३ टी–२० सामने खेळले गेले आहेत आणि प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघांनी नऊ वेळा विजय मिळवला आहे. लक्ष्याचा पाठलाग करणाऱ्या संघांनीही १४ वेळा विजय मिळवला आहे. मैदानावर पहिल्या डावात सरासरी धावसंख्या ४५२ धावा आहेत आणि दुसऱ्या डावात सरासरी धावसंख्या १३३ धावा आहेत.

दोन्ही संघांचा हेड टू हेड रेकॉर्ड कसा : आयर्लंड विरुद्ध इंग्लंड टी–२० सामन्यांचा विचार केला तर, या सामन्यांमध्ये आयर्लंडचाच वरचष्मा आहे. दोन्ही संघांमध्ये एकूण दोन सामने खेळले गेले आहेत आणि आयर्लंडनं एक सामना जिंकला आहे, तर एक सामना अनिर्णित राहिला आहे. हा सामना भारतात फॅमकोड ॲपवर लाईव्ह पाहता येणार असून कोणत्याही टीव्ही चॅनलवर प्रसारित केला जाणार नाही.

एकूण सामने – ०२  
आयर्लंड जिंकला – ०१  
इंग्लंड जिंकला – ०  
टाय – ०१

सामन्यासाठी दोन्ही संघ :इंग्लंड : जेकब बेथेल (कर्णधार), रेहान अहमद, सोनी बेकर, टॉम बँटन, जोस बटलर, लियाम डॉसन, टॉम हार्टले, विल जॅक्स, साकिब महमूद, जेमी ओव्हरटन, आदिल रशीद, फिल साल्ट, ल्यूक वूड, जॉर्डन कॉक्स, सॅम करनआयर्लंड : पॉल स्टर्लिंग (कर्णधार), रॉस अडायर, बेन कॅलिट्झ, कर्टिस कॅम्फर, गॅरेथ डेलानी, जॉर्ज डॉकरेल, ग्राहम ह्यूम, मॅथ्यू हम्फ्रीज, बॅरी मॅकार्थी, जॉर्डन नील, हॅरी टेक्टर, लोर्कन टकर, बेन व्हाइट, क्रेग यंग

# युएईचे आव्हान पार करत पाकिस्तान सुपर फोरमध्ये

पाकिस्तानने युएईला नमवत बाद फेरी अर्थात सुपर फोरमध्ये प्रवेश केला आहे.

बहिष्काराचं अस्त्र परजून म्यान केलेल्या पाकिस्तानने युएईविरुद्ध खेळायचं ठरवलं. मात्र अनुनभवी संघाविरुद्ध जिंकताना त्यांना संघर्ष करावा लागला. युएईने नाणेफेक जिंकून फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. भारताविरुद्धच्या सामन्यातल्या चुका कायम राखत पाकिस्तानने हाराकिरी केली. फखर झमान आणि शाहीन शहा आफ्रिदी यांच्या महत्त्वपूर्ण खेळींमुळे १४६ धावांची मजल मारता आली. युएईने सुरुवात चांगली केली पण त्यानंतर नियमित अंतरात विकेट्स गमावल्या. पाकिस्तानने ४१ धावांनी सामना जिंकत सुपर फोर फेरी गाठली आहे.

युएईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. आक्रमक खेळीसाठी ओळ–खला जाणारा सईम अय्युब भोपळाही न फोडता तंबूत परतला. तिसऱ्या षटकात साहिबजादा फरहानही बाद झाला. कर्णधार सलमान अघाकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. पण तो २० धावा करुन तंबूत परतला. फखर झमान आणि सलमानची भागीदारी डाव सावरणार असं चित्र होतं मात्र सलमान बाद झाला. सिमरनजीत सिंगने हसन नव–ाझला तंबूत धाडलं. खुशदिल अवघ्या ४ धावा करून माघारी परतला. फखरने एका बाजूने किल्ला लढवत ३६ चेंडूत २ चौकार आणि ३ षटकारांसह ५० धावांची खेळी केली. विकेटकीपर फलंदाज मोहम्मद हॅरिसने फखरला साथ दिली. त्याने १४ चेंडूत १८ धावा केल्या. जुनैद सिद्दीकीने त्याला बाद केलं. शाहीन शहा आफ्रिदीने या लढतीतही संघाची इभ्रत वाचवली. त्याने १४ चेंडूत ३ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद २९ धावांची खेळी केली. यामुळे पाकिस्तानने १४६ धावांची मजल मारली.

युएईला कर्णधार मुहम्मद वासिमकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती पण तो १४ धावा करुन तंबूत परतला. राहुल चोप्राने सर्वाधिक ४० धावांची खेळी केली. ध्रुव पराशरने २० धावा करत त्याला चांगली साथ दिली. हे दोघे बाद होताच युएईच्या विजयाच्या आशा मावळल्या. पाकिस्तानतर्फे शाहीन शहा आफ्रिदी, हारिस रौफ, अबरार अहमद यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.



सामन्याआधी काय घडलं?

रविवारी झालेल्या भारत–पाकिस्तान लढतीत भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादव आणि पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली अघा यांनी नाणेफेकीच्या वेळेस हस्तांदोलन केलं नाही. सामना संपल्यानंतर भारतीय संघाने पाकिस्तानच्या खेळाडूंशी हस्तांदोलन नाकारलं. या प्रकारामुळे नाराज होऊन पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली अघा पुरस्कार वितरण सोहळ्याला उपस्थित राहिला नाही. पत्रकार परिषदेला त्याच्याऐवजी प्रशिक्षक माईक हेसन उपस्थित होते. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने हे प्रकरण पुढे रेटत सामनाधिकाऱ्यांना लक्ष्य केलं. पायक्रॉफ्ट यांनी हस्तांदोलन करू नका अशी सूचना दिल्याचा आरोप पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने केला. पायक्रॉफ्ट यांची तातडीने हकालपट्टी करावी अशी मागणी पीसीबीने केली होती. मागणी पूर्ण न झाल्यास उर्वरित सामन्यांवर बहिष्कार टाकण्याचा इशारा पाकिस्तानने दिला होता.

हस्तांदोलन न करण्याचा मुद्दा पेटला. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोह–सीन नक्वी यांनी याप्रकरणी सामनाधिकारी अँडी पायक्रॉफ्ट यांना लक्ष्य केलं. पायक्रॉफ्ट यांनीच कर्णधारांना हस्तांदोलन न करण्याची सूचना केली होती असा आरोप नक्वी यांनी केला. पायक्रॉफ्ट यांची तातडीने हकालपट्टी करण्यात यावी अशी मागणी त्यांनी आयसीसीकडे केली. मागण्या पूर्ण न झाल्यास पाकिस्तान युएईविरुद्धच्या लढतीवर बहिष्कार घालण्याचे संकेत दिले होते. मात्र आता हा सामना होत आहे.सामन्याआधी पीसीबीच्या वाटाघाटी बैठकी सुरू असल्यामुळे पाकिस्तानच्या खेळाडूंनी मैदान सोडलं नव्हतं. बहिष्कार न घालण्याचा निर्णय झाल्याने पाकिस्तानचा संघ अखेर रवाना झाला. या प्रकारामुळे सामना तासभर उशिराने सुरू करण्यात आला.

अँडी पायक्रॉफ्ट यांनी आयसीसी कोणत्याही नियमाचं उल्लंघन केलेलं नाही. याउलट त्यांनी जोखमीची परिस्थिती शिताफीने हाताळली. कर्णधारांनी हस्तांदोलन करू नये असा निर्णय संयोजकांनी घेतला आहे हा मुद्दा पायक्रॉफ्ट यांनी दोन्ही संघांच्या कर्णधारांसमोर मांडला. आयत्यावेळी गोंधळ होऊ नये यासाठी पायक्रॉफ्ट यांनी दोन्ही कर्णधारांशी समन्वय साधला.पायक्रॉफ्ट यांच्या विरोधात तक्रार करण्याचा अधिकार पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला आहे. पण आयसीसीने यासंदर्भात अंतर्गत चौकशी प्रक्रिया केली असून पायक्रॉफ्ट यांनी त्यांच्या कामात कोणतीही चूक केलेली नाही तसंच नियमांचं उल्लंघन केलेलं नाही असं स्पष्टपणे नमूद केलं.सामनाधिकारी तसंच पंचांची नियुक्ती आयसीसीतर्फे केली जाते. ही एक स्वतंत्र तटस्थ यंत्रणा आहे. पायक्रॉफ्ट यांना पदावरून दूर केल्यास चुकीचा पायंडा पडू शकतो. तसं होणं योग्य नाही असं आयसीसीने म्हटलं होतं.

## लातूर येथील रेश्मा भवरे यांची महिला समन्वयक पदावर फेरनिवड



**लातूर/प्रतिनिधी :** बँक ऑफ महाराष्ट्र,शाहू चौक लातूर येथील लिपिक रेश्मा भवरे यांची बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लाईज युनियन औरंगाबाद विभागाच्या महिला समन्वयकपदी फेरनिवड झाली आहे,त्यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लाईज युनियन औरंगाबादचे रविवारी १४ वै त्रैवार्षिक अधिवेशन पार पडले.यावेळी युनियनच्या नवीन पदाधिकाऱ्यांची निवड झाली करण्यात आली,त्यावेळी लातूर येथील शाहू चौक शाखेतील कर्तव्यदक्ष लिपीक रेश्मा भवरे यांच्या मागील कार्याची दखल घेवून,त्यांची बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लाईज युनियन औरंगाबाद महिला विभाग समन्वयक पदावर पुश्नच निवड केल्याचे जाहीर करण्यात आले.रेश्मा भवरे यांच्या या निवडीचे बँक कर्मचाऱ्यांसह शाहू चौक शाखाधिकारी निखिल पाथरकर, कर्मचारी उदय मोरे, प्रवीण जाधव, गणेश बी.,संकेत धुमाळ,माजी कर्मचारी मिलींद गायकवाड,बँक कर्मचारी,तसेच ॲड.विक्रांत शंके,हरी गोटेकर आदिंनी अभिनंदन केले आहे.

## मराठवाडा जनता विकास परिषदेच्या केंद्रीय अध्यक्षपदी प्रा. डॉ. सोमनाथ रोडे व केंद्रीय सचिवपदी प्रा. अर्जुन जाधव यांची निवड




**लातूर/प्रतिनिधी :** मराठवाडा जनता विकास परिषदेची छत्रपती संभाजीनगर येथे दि. १४/०९/२०२५ रोजी स्वामी रामानंद तिर्थ सभागृह नागेश्वरवाडी छत्रपती संभाजीनगर येथे संस्थेची सर्वसाधारण सभा संपन्न झाली. या झालेल्या सर्वसाधारण सभेत मराठवाडा जनता विकास परिषदेच्या केंद्रीय अध्यक्ष पदी महाराष्ट्रातील प्रसिध्द विचारवंत प्रा. डॉ. सोमनाथ रोडे यांची बहुमताने निवड करण्यात आली. याच सर्वसाधारण सभेमध्ये केंद्रीय सचिव पदी प्रा. अर्जुन जाधव यांची निवड करण्यात आली. कोषाध्यक्ष पदी अशोक सिध्देवाड यांची निवड करण्यात आली. यावेळी व्यंकटेश काबदे माजी अध्यक्ष, जीवन देसाई माजी सचिव तसेच मराठवाडयातील आठ जिल्हयातून संस्थेचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते. धाराशिव येथून संघटनेचे अध्यक्ष सुरेश शेळके, भाऊसाहेब शिनगारे, प्रा. धनंजय लोंढे, डी.एम. पाटील, अमोल घोगरे, विजय गायकवाड, सागर जाधव, सुभाष चव्हाण उपस्थित होते. या निवडीबद्दल धाराशिव शाखेच्या वतीने सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचलित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या प्रसंगी शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी शाळेचे समन्वयक रौफ शेख, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, संगिता शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती. ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर शाळेच्या विद्यार्थ्यांनी योगाचे प्रात्यक्षिक सादर केले. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे ओचीत्य साधून शाळेची विद्यार्थिनी स्वीटी शहा या विद्यार्थिनीने मनोगत व्यक्त केले. सर्व विद्यार्थ्यांना, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या समन्वयिका रुपाली कोकाटे यांनी केले. सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल येथे ७७ वा मराठवाडा मुक्तीसंग्राम साजरा



**लातूर/प्रतिनिधी :** : येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल च्या वतीने ७७ वा मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी सनदी लेखापाल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ लातूर चे विभागीय संघचालक श्री संजयजी अग्रवाल यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले. यावेळी अमर जवान ज्योती स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून प्रमुख अतिथी यांच्या समवेत मान्यवरांनी हुतात्म्यांना अभिवादन केले.

'या मातीच्या पुण्याई चा ..!' हे मराठवाडा गीत प्रभावीपणे सादर करून विद्यालयाचा संगीत विभाग व शिक्षक वृंद शिरीष देशपांडे, गीता मुढे, कौस्तुभ जोशी, संदीप केंद्रे, मनीषा मगर, अमिता पाठक, पूनम सूर्यवंशी, वर्षा नारायणपुरे, रेणुका देशपांडे, सुनिता बरगले, स्वरांजली देशपांडे, कविता हिबारे, विनिता पाटील, प्रीती पाटील, वीरनाथ डोंगरे, आदित्य पाटील यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले तर विज्ञान शिक्षक श्री भूषण भोगावकर यांनी मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा मागोवा, स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पुरणमल जी लाहोटी यांचे लढ्यास लाभलेले अर्थसहाय्य, निजामाच्या जुलुमी राज्याचा अंत व लढ्यातील लातूर नगरीचे योगदान यावर आपल्या अभ्यासपूर्ण मनोगतातून प्रस्तुत केला. कला विभाग प्रमुख हनुमंत थडकर, अमोल देशमुख, प्रशांत शिंदे निर्मित भुअलंकरण व मिडीया क्लब द्वारे निर्मित 'गौरवगाथा मराठवाड्याची' भित्तीपत्रक सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. याप्रसंगी विद्यालयाचे चेअरमन श्री आनंद लाहोटी जी, श्री मारवाडी राजस्थान शिक्षण संस्थेचे विश्वस्त श्री हुकुमचंद कलंत्री जी, संचालक सी ए श्री किशोर भराडीया जी, प्राचार्य कर्नल श्रीनिवासुलू जी, कुलसचिव प्रवीण शिवणगीकर, माध्यमिक समन्वयक श्री मनोहर कबाडे, प्राथमिक विभाग प्रमुख श्रीमती अरुल सेल्वी यांची उपस्थिती होती.

''मराठवाडा गीतातील प्रत्येक शब्द शक्तिदायी असून आपल्या मराठवाड्याचे भौगोलिक, सांस्कृतिक वैभव टिकविण्यासाठी वाढविण्यासाठी संकल्प घेण्याचे प्रतिवेदन या गीतातून आपण अनुभवतो, नागरिक शिष्टाचार, पर्यावरण संवर्धन हा आपल्या मुख्य जबाबदारीचा भाग असून, तो निष्ठेने पूर्ण करून, संपूर्ण समाजाच्या एकसंधतेतूनच 'मराठवाडी मानध्वजा' गौरवाने वर्धिष्णू राहील असे प्रतिपादन प्रमुख अतिथी संजयजी अग्रवाल यांनी आपल्या मनोगतातून केले. ते पुढे म्हणाले, जगात क्रांती करणारे सर्वच महापुरुष कदाचित उच्च शिक्षित नसतील पण ते उच्चसंस्कारी होते हे आवर्जून स्मरणात ठेवले पाहिजे, उच्च संस्काराची खाण आपल्या परिवारात आजी आजोबा, गुरुजन यांच्या समवेत उत्तम व नित्य संवाद तसेच सानिध्यात राहून प्राप्त होतात, संस्कारहीन पिढीमुळे राष्ट्र लयास जाऊ शकते याचा प्रत्यय जगातील अनेक देशात दिसून आलेला आहे, ज्ञानप्राप्ती सोबतच संस्कारीत पिढी हेच देशाचे भविष्य आहे असेही त्यांनी सांगितले. भारतीय नागरिकाचे अनुशासन हीच भारताच्या उन्नतीचा मुख्याधार आहे त्यामुळे शिस्त, संस्कार व इतिहासाचे स्मरण ही आपल्या जीवनाची त्रिसूत्री आहे. हैदराबाद मुक्ती संग्रामामध्ये लोकांच्या मनात स्वातंत्र्य आणि न्यायासाठीची तीव्र इच्छा होती. निजामाच्या दडपशाहीला आणि अन्यायाला सामोरं जाताना, विविध भागातील लोकांनी एकत्र येऊन संघराज्यात सामील होण्यासाठी मोठा संघर्ष केला. मराठवाड्याचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा या लढ्याच्या माध्यमातून अधिक दृढ झाला आणि आपण विजयी झालो. एकसंधता नसल्याने आपण पारतंत्र्यात गेलो होतो आणि समाज एकसंध झाल्याने आपण विजयी झालो हा संदेश मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या इतिहासातून प्रेरणा घेत उज्ज्वल भविष्याचा वेध आपणास घ्यावयाचा आहे. भारत देशाला अतिशय समृद्ध असा इतिहास आहे. समृद्धी आणि सामर्थ्यवान या दोन महान गुणांमुळे भारत देश अहिंसा तत्वाने आपुलकीने प्रगतीच्या प्रगतीच्या शिखरावर आपणास दिसत आहे. विलायती ला जाण्याच्या आकर्षणापेक्षा मातृभूमीची सेवा करण्यातच खरी धन्यता आहे. मातृभूमीसाठी आपल्या गुणवत्तेचे योगदान दिले पाहिजे विद्यार्थी जीवन हि मोठी संधी आहे, स्वयंशिस्त, संस्कारक्षम, परिश्रम आदी गुणांसह एक विद्यालय या नात्याने आपण सर्व त्यांच्या उत्कर्षासाठी प्रयत्नशील आहात हे पाहून अतीव समाधानी आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणित शिक्षक श्री योगेश महाजन यांनी तर आभार प्रदर्शन मराठी विभाग प्रमुख सौ देवयानी देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कुलसचिव प्रवीण शिवणगीकर, कॅप्तन बी के भालेराव, आशीद बनसोडे, शैलेन्द्र डावळे, सुनील मुनाळे, विवेक डोंगरे, ज्ञानेश्वर यादव, मयूर पोतनीस, व्यंकटेश इबित्दार, मंगेश रंकाळे, नितीन पुंड, गजानन सोनी, अमृत पालवे, विकास बनसोडे, ज्ञानेश्वर गोसावी, तुषार यवनगे यांनी योगदान दिले.

## हिंदी भाषा भारतीय एकात्मतेचे प्रतीक आहे - प्रा. डॉ. दिलीप गुंजरगे






बाभळगाव '' भारतीय भाषांमध्ये हिंदी ही एक राजभाषा म्हणून संविधानामध्ये नोंदवली गेली आहे. जगाच्या पाठीवर तिसऱ्या क्रमांकावर बोलल्या जाणाऱ्या हिंदी भाषेचा गौरव दिन म्हणून १४ सप्टेंबर आपल्याकडे साजरा केला जातो. देश विदेशात आता हिंदी भाषिक मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. नामवंत हिंदी साहित्यिकांनी मोठ्या प्रमाणावर हिंदीमध्ये लेखन केले आहे. हिंदी भाषा ही भारतीय एकात्मतेचे प्रतीक आहे.'' असे प्रतिपादन जयक्रांती महाविद्यालय, लातूर येथील हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. दिलीप गुंजरगे यांनी केले.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथे हिंदी दिनाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.दिलीप गुंजरगे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी विद्याार्थ्यांना सामाजिक ऐक्याची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे होते. यावेळी अध्यक्ष स्थानावरून ते म्हणाले, '' आपण सगळ्याच भाषेचा सन्मान केला पाहिजे. आपली भाषा, संस्कृती, रीती - रिवाज याचा प्रत्येकाला गर्व असायला हवा. आम्ही मराठी, हिंदी, इंग्रजी असे समन्वय मंडळ महाविद्यालयात स्थापन केले आहे. त्यातून विद्यार्थ्यांचा भाषिक विकास होण्यास खूप मदत होते आहे. समाजात सामाजिक अभिसरणाचे काम भाषा करत असते. भाषेमुळे समाज एक संघ राहतो.''

हिंदी दिनाच्या निमित्ताने विचारपीठावर हिंदी विभाग प्रमुख डॉ. रणजीत जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ.माधव गायकवाड यांनी केले. यावेळी पायल शिरसागर, सुरवसे पूजा, पाटील गौरी, समीक्षा श्रीमंगले, माने स्नेहा, म्हेत्रे राधिका, कुमारी किरण यांनी हिंदी दिनाच्या निमित्ताने आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन अपेक्षा मस्के आणि धरती मस्के यांनी केले व आभार प्रा. शिल्पा हालसिकर यांनी मानले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कॉक्सिटच्या दोघी गुणवत्ता यादीत



**लातूर/प्रतिनिधी :** बीएस्सी तृतीय वर्षाच्या परीक्षेत येथील जैव तंत्रज्ञान विभागात कॉक्सिटच्या दोन विद्यार्थिनी विद्यापीठात प्रथम व द्वितीय आल्या आहेत. रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील यांनी त्यांचा सत्कार केला.

महाविद्यालयाच्या बीएस्सी जैव तंत्रज्ञान विभागात तृतीय वर्षातील नाजीया युसूफ शेख हिने ८५.९ टक्के गुण घेत विद्यापीठात सर्वप्रथम आली आहे. तर अक्षता धर्मराज बिरादार हिने ८४.३४ टक्के गुण घेत विद्यापीठात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. या यशाबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील यांच्या हस्ते नाजीया शेख व अक्षता बिरादार या दोघींचा सत्कार करण्यात आला. यावेळी कॉक्सिटचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. जाधव, उपप्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, तज्ज्ञ संचालक एन. डी. जगताप, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. भोसले, उपप्राचार्य डॉ. डी. आर. सोमवंशी यांच्यासह विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

# हैदराबाद मुक्ती संग्राम हा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अत्यंत महत्त्वाचा लढा समजला जातो - प्राचार्य डॉ. विजय कुलकर्णी



**लातूर/प्रतिनिधी :** हैद्राबाद मुक्ती संग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेडच्या विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड आणि दयानंद कला महाविद्यालय,लातूर मराठी भाषा व वाङ्.मय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ''हैद्राबाद मुक्ती संग्राम समजून घेताना'' या विषयावरील विशेष व्याख्यान विद्यार्थ्यांच्या उत्तम प्रतिसादात संपन्न झाले. सुप्रसिद्ध व्याख्याते डॉ. विजय कुलकर्णी यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी ते म्हणाले की, हैदराबाद मुक्ती संग्राम हा भारतीय इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण असा ऐतिहासिक दस्तऐवज आहे हा भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अत्यंत महत्त्वाचा लढा समजला जातो. हैदराबाद संस्थान हे निजामकालीन बादशाह उस्ताद अली खान या बादशहाच्या ताब्यात होते हे संस्थान भारतीय संघराज्यामध्ये समाविष्ट करण्यासाठी हैदराबाद जनतेने विशेषत: मराठवाड्यातील जनतेने खूप परीक्षम घेतले. अनेक आंदोलने केली. हैदराबाद मुक्तिसंग्राम लढ्यामध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांचा सिंहाचा वाटा आहे त्यांनी व मराठवाड्यातील जनतेने १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यामध्ये विलीन केले हाच दिवस हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन म्हणून ओळखला जातो हैदराबाद संस्थानातून मुक्त झाल्यामुळेच मराठवाड्यातील जनतेला खरे स्वातंत्र्य प्राप्त झाले. स्वामी रामानंद तीर्थ यांनी दिलेले योगदान हे वाखनण्याजोगे आहे म्हणून त्यांनी केलेल्या कार्य कर्तुत्वाचा गौरव म्हणून त्यांचे नाव नांदेड विद्यापीठाला देण्यात आले हे अत्यंत अभिमानाची व गौरवाची बाब आहे. या मुक्ती संग्रामाला अनेक कांगोरे असून अनेक समाजाच्या संघर्षाचे हे फलित आहे. असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचा उद्देश सांगताना विद्यार्थ्यांनी मुक्तीसंग्रामाचा प्रेरक इतिहास समजून घेणे आवश्यक आहे. असे मत प्रदर्शित करुन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने अशा प्रेरणादायी उपक्रमास दिलेल्या अनुदानाबद्दल आभार मानले.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड म्हणाले की, हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिन व विद्यापीठ वर्धापन दिन महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. हैद्राबाद सस्थांन भारतीय संघराज्यामध्ये समाविष्ट करण्यासाठी भारतीय स्वातंत्र्य कायदा असतित्वात आणला व अनेक पोलीस कार्यवाही करावी लागली यालाच ऑपरेशन पोलो असे संबोधले जाते. या बरोबरच बहुसंख्य जनता व स्वामी रामानंद तीर्थ या नेत्याने आंदोलने करून हैद्राबाद संस्था निजामशाहीतुन मुक्त केली. हे मराठवाड्यातील जनतेसाठी अत्यंत आनंदाची बाब होती.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी डॉ. संतोष पाटील, मराठी विभाग प्रमुख डॉ. सुनीता सांगोले यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन मराठी विभागातील डॉ. अंकुश कुमार चव्हाण, डॉ. सुभाष कदम, प्रा. राजकुमार मोरे प्रा. अंगद भुरे, प्रा. स्नेहा वाघमारे, प्रा. विद्या गिराम, प्रा. सुलक्षणा सोनवणे यांनी केले.सूत्रसंचालन प्रा. राजकुमार मोरे यांनी तर आभार प्रा. अंगद भुरे यांनी मानले. महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत व्याख्यान संपन्न झाले.

# दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगावचे संयुक्त ध्वजारोहण संपन्न



बाभळगाव : मराठवाडा मुक्ती संग्राम आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड वर्धापन दिन निमित्ताने दयानंद शिक्षण प्रसारक, मंडळ बाभळगाव द्वारा संचलित सर्व विद्या शाखेंच्या वतीने ध्वजारोहण संस्थेच्या क्रीडा मैदानावर विविध कार्यक्रमांच्या आयोजना सोबत प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सांस्कृतिक विभागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र सादर केले. दयानंद प्राथमिक विद्यालयाचे ध्वजारोहण संस्थेचे संचालक मारुती मस्के, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ध्वजारोहण गोविंद देशमुख तर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे ध्वजारोहण शिक्षण अधिकारी जाधव एन एम बीट बाभळगाव यांच्या हस्ते संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आंतर महाविद्यालयीन अ विभाग कबड्डी स्पर्धेत प्रथम आलेल्या

विद्यार्थीनी संघास ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. क्रीडा विभागातील वैयक्तीक बक्षीस देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाला दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगावचे उपाध्यक्ष नरसिंह देशमुख, सचिव शाम देशमुख, कोषाध्यक्ष आयुब शेख, संचालक दासराव गायकवाड, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, इमाम मुजावर, मुख्याध्यापक फिरे सर, रत्नदीप गायकवाड, स्वामी मॅडम, प्राचार्य पठाण मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दशरथ भिसे तर आभार डॉ. नाना जाधव यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडा संचालक डॉ. वैशाली माढेकर, डॉ. जयदेवी पवार, क्रीडा शिक्षक आयरेकर, डॉ.मा. ना.गायकवाड, डॉ. पांडुरंग मुंढे, प्रा. शिल्पा हालसीकर, अंकुश थडकर, दत्ता फुलगामे, नितीन पाटील आणि बालाजी देशमुख यांनी परिश्रम घेतले.

यावेळी संस्थेतील विविध शाखेतून प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **NAWAB FAROOQ PASHA**
TO: **SHAIKH FARUQ ABDUL KARIM**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **SHAIKH FARUQ ABDUL KARIM** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **NAWAB FAROOQ PASHA**
NEW NAME :- **SHAIKH FARUQ ABDUL KARIM**
Address - Naldurg Taluka Tuljapur Dist Osmanabad. -413602
Adhar n.-938038149760 Mob.9545508314

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **KAZI TOUSHIK AHAMAD RAFIK AHMAD** TO: **KAZI TAUSIK AHMAD RAFIK AHMAD**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **KAZI TAUSIK AHMAD RAFIK AHMAD** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **KAZI TOUSHIK AHAMAD RAFIK AHAMAD**
NEW NAME :- **KAZI TAUSIK AHMAD RAFIK AHMAD**
Address - Mahajan Galli Osmanabad Taluka Osmanabad DIST. Osmanabad. -413602
Adhar n.-212940883566 Mob.9158858139

**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **SHAIKH HAJULAL** TO: **HAJULAL ABDULSAB SHAIKH**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **HAJULAL ABDULSAB SHAIKH** in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **SHAIKH HAJULAL**
NEW NAME :- **HAJULAL ABDULSAB SHAIKH**
Address - At Post Naldurg Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413602
Adhar n.-380643269475
Mob.7798511614


# प्रत्येक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळणारच : पालकमंत्री प्रताप सरनाईक

## वडगाव (सिद्धेश्वर)येथे पिकांच्या नुकसानीची पाहणी

धाराशिव, दिनांक १६ (जिमाका) : अतिवृष्टीने जिल्ह्यात शेतकरी, पशुपालक यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्यासाठी जिल्हा प्रशासनाला सूचना केलेल्या आहेत.त्याप्रमाणे कार्यवाही सुरूच आहे. या अतिवृष्टीने नुकसान झालेल्या प्रत्येक शेतकऱ्यांना, पशुपालकांना शासन मदत मिळेल. एकही नुकसानग्रस्त मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही परिवहन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी शेतकऱ्यांना दिली.



धाराशिव तालुक्यातील वडगाव (सिद्धेश्वर) येथे नुकसानग्रस्त शेत पिकांची पाहणी भर पावसात पालकमंत्री सरनाईक यांनी आज केली. यावेळी ते बोलत होते. वडगाव (सि.) येथील शेतकरी भुजंग जानराव यांनी लावलेल्या दोन एकर सोयाबीन पिकांची पाहणी पालकमंत्री सरनाईक यांनी केली व जानराव यांची व्यथा त्यांच्या बांधावर जात जाणून घेतली. यावेळी गजेंद्र जाधव यांनीही परिसरातील पिकांच्या नुकसानीची माहिती पालकमंत्री सरनाईक यांना दिली.

पाहणी प्रसंगी जिल्हाधिकारी किर्ती कुमार पुजार, उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी महादेव आसलकर, तलाठी माधव कदम, कृषी व महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा प्रशासनाने ऑगस्टपर्यंत झालेल्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण केले आहेत. त्यासंबंधी नुकसान भरपाई मिळण्याबाबतचा प्रस्ताव देखील शासनास सादर केला आहे. परंतु त्यानंतरही अतिवृष्टी, पावसाने शेतकरी, पशुपालक यांचे नुकसान झालेले आहे, त्याबाबतचे पंचनामे करण्याची कार्यवाही सुरूच आहे. ही कार्यवाही पूर्ण होताच शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल. प्रत्येक नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासन मदत मिळेल, असे पालकमंत्री सरनाईक यांनी यावेळी शेतकऱ्यांना सांगितले.

### शिवीगाळ, लाथाबुक्यांने, काठीने मारहाण करुन केले जखमी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत गौरीशंकर, विजय, अश्विनी, बाळासाहेब , जयशंकर सर्व रा. ज्ञानेश्वर मंदीराचे पाठीमागे मुक्तेश्वर कॉलनी धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.११.०९.२०२५ रोजी ज्ञानेश्वर मंदीराचे पाठीमागे मुक्तेश्वर कॉलनी धाराशिव फिर्यादी नामे-प्रणिता रा. ज्ञानेश्वर मंदीराचे पाठीमागे मुक्तेश्वर कॉलनी धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे चारीत्र्यावर संशय घेवून नमुदांनी शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, काठीने मारहाण करुन जखमी केले.


**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**


# स्त्रीशक्तीला आरोग्यशक्तीची साथ, विकसित भारताचा ठरणार आधार

# धाराशिव जिल्हयात स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानाचा शुभारंभ



धाराशिव (प्रतिनिधी)- महिलांचे आरोग्य व सक्षमीकरण हे कुटुंब, समाज आणि देशाच्या प्रगतीचे प्रमुख केंद्रस्थान आहे. याच उद्देशाने आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे विशेष राष्ट्रीय अभियान दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे. या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ इंदौर, मध्य प्रदेश येथे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते होणार असून या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण देशभरातील प्रमुख ठिकाणी करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील राज्यस्तरीय शुभारंभ सोहळा दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यभर होणार असून राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सेंटर, रंगस्वर सभागृह नरिमन पॉईंट येथे मा. राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, राज्यमंत्री आणि मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, महिला व बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रिफ तसेच इतर विभागाचे मंत्री, स्थानिक लोकप्रतिनिधी,यांचे हस्ते झाले आहे.

धाराशिव जिल्हयामध्ये जिल्ह्यांचे सनमाननिय लोकप्रतिनिधी तसेच वैद्यकिय अधिष्ठता डॉ.शेलेंद्र चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतिष हरिदास,जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. धनंजय चाकुरकर यांचे उपस्थीतीत शासकिय स्त्री रुग्णालय धराशिव येथे आज दि.१७ सप्टेबर २०२५ रोजी पार पडला.

मा.पालकमंत्री मा. प्रताप सरनाईक, यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यासह उपकेंद्र उपळा येथे भेट दिली. यावेळी आरोग्य सेवांची तयारी, उपलब्ध मनुष्यबळ, औषधसाठा, जनजागृती उपक्रम आदींचा आढावा घेण्यात आला. पालकमंत्र्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना महिलांच्या आरोग्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या. या प्रसंगी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार,मुख्य कार्याकारी डॉ.मैनांक घोष,जिल्हा आरोग्य अधिकारी धाराशिव डॉ. सतिष हरिदास, जिल्हा माता बालसंगोपन अधिकारी कुलदीप मिटकरी उपस्थीत होते.

जिल्यातील ४४ प्राथमिक आरोग्य केंद्र, २ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र,२७ आयुष्मान आरोग्य मंदिर, ६ ग्रामीण रुग्णालये, ६ उपजिल्हा रुग्णालये, १ सामान्य रुग्णालये, १ स्त्री रुग्णालये, १ शासकिय वैद्यकिय महाविद्यालय येथे १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान स्वस्त नारी सशक्त परिवारा अभियान अतर्गत महिला आणि मुलांसाठी तपासणी करुन संदर्भ सेवा देण्यात येणार आहेत. जिल्हयात एकुण २५६ ठिकाणी आरोग्य शिबीराचे आयोजन केले असुन आज रोजी जिल्हयातील एकुण १५ आरोग्य संस्थामध्ये या अभियाना अतर्गत आरोग्य शिबीरे घेण्यात आली.

***अभियानाची उद्दिष्ट्ये ***

या अभियानाचा मुख्य उद्देश देशभरातील ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये महिला आणि मुलांसाठी तपासणी व विशेषज्ञ आरोग्य शिबिरांचे आयोजन

आयुष्मान आरोग्य मंदिरांमध्ये दररोज (AAMASHC) तपासणी आणि जनजागृती शिबिरांचे आयोजन

ग्रामीण रुग्णालये / उपजिल्हा रुग्णालये (CHCs) आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे (AAM-PHC/UPHC) येथे विशेषज्ञाव्दारे तपासणी शिबिरांचे आयोजन

खासगी महात्मा फुले जनआरोग्य योजना संलग्नीत रुग्णालये व क्लिनिक येथे देखील विशेषज्ञ आरोग्य शिबिरे

*या शिबिरांमध्ये विविध आरोग्य सेवा पुरवल्या जातील, ज्यात खालील गोष्टींचा समावेश आहे:*

*महिलांची आरोग्य तपासणी:-*

उच्च रक्तदाब आणि मधुमेहाच्या निदानासाठी तपासणी करणे.

तोंडाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग आणि गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या निदानासाठीची तपासणी करणे.

जोखीम असलेल्या महिलांसाठी क्षयरोग (Tuberculosis) तपासणी.

किशोरवयीन मुली आणि महिलांसाठी निमिया (रक्तक्षय) तपासणी आणि समुपदेशन.

आदिवासी भागातील महिलांसाठी सिकल सेल तपासणी कार्ड वाटप आणि आदिवासी भागात सिकल सेल आजाराबाबत समुपदेशन.

माता आणि बाल आरोग्य सेवा*

गर्भवती महिलांसाठी प्रसूतिपूर्व काळजी (ANC) तपासणी व समुपदेशन.

हिमोग्लोबिन तपासणी, तसेच पोषण आणि काळजी यावर समुपदेशन.

बालकांचे आवश्यकतेनुसार लसीकरण

आयुष सेवा*

या अंतर्गत आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, युनानी, सिध्द व नॅचरोपॅथी इ. पर्यायी उपचार पध्दतींची सेवा गरजू रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**जनजागृती आणि वर्तणूक बदल संवाद***

किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळीची स्वच्छता आणि पोषणाविषयी जागृती सत्रे

महिला बचत गट (SHGs) आणि पंचायत प्रतिनिधींच्या माध्यमातून खाद्यतेल आणि साखरेचा वापर कमी करण्यावर समुपदेशन.

पोषण विषयी समुपदेशन व निरोगी राहण्यासाठी मार्गदर्शन

**रक्तदान शिबीरे***

१ ऑक्टोबर हा राष्ट्रीय स्वेच्छा रक्तदान दिन असून त्याअनुषंगाने राष्ट्रीय महास्वेच्छा रक्तदान या अभियानात राबविण्यात येईल. इंडियन रेड क्रॉस सोसायटी, अखिल भारतीय तेरापंथ युवक परिषद इ. संस्थांच्या साहायाने १ लाख युनिट रक्त गोळा करण्याचे ध्येय असून, रक्तदात्यांची नोंदणी करण्याचेही प्रस्तावित आहे. चू ंत्रें. झेंीरंश्र द्वारे रक्तदान प्रतिज्ञा उपलब्ध करुन देण्यात येईल.

**नोंदणी आणि कार्ड वाटप***

आयुष्यमान भारत डिजीटल मिशन कार्ड (ABDM), पंतप्रधान जन आरोग्य योजना (PMJAY) अंतर्गत नोंदणी व आयुष्यमान वय वंदना कार्ड वाटप सर्व गरजू व पात्र लाभार्थ्यांना करण्यात येईल.

**क्षयरोग निर्मुलनासाठी निक्षय मित्र स्वयंसेवकांची नोंदणी***

क्षयरुग्णांना दत्तक घेऊन त्यांना पोषक आहार उपलब्ध करुन देण्यासाठी आणि क्षयरोगाविरुध्द जन आंदोलनाला पाठींबा देण्यासाठी दानशुर व्यक्ती, संस्था आणि संघटनांना निक्षय मित्र बनवून सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. याकरिता माय भारत स्वयंसेवक अथवा इतर स्वयंसेवकाच्या मदतीने निक्षय मित्रांची नोंदणी वाढवण्यात येईल, जेणेकरुन क्षयरोग मुक्त भारताचे ध्येय साध्य करणे शक्य होईल.

तपासणी शिबीरामध्ये (Screening camp) मध्ये आवश्यक असणा-या रुग्णांना विशेषज्ञा कडून तपासणी साठी संदर्भित केले जाईल व त्यांच्या आवश्यक त्या रक्त लघवीच्या तपासण्या, सोनोग्राफी, क्षकिरण तपासणी व शस्त्रक्रिया मोफत व नियोजन करुन करण्यात आले आहे.

***धाराशिव जिल्हयात दि. १७ सप्टेंबर २०२५ रोजीचे ७५ उपक्रम:***

प्राथमिक आरोग्य केंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये आरोग्य शिबिरे.

असंसर्गजन्य रोग तपासणी शिबिरे (मधुमेह, रक्तदाब, कर्करोग, हृदयरोग).

मोफत चष्मा वाटपासह नेत्र तपासणी शिबिरे.

दंत तपासणी शिबिरे.

माता आणि बाल आरोग्य शिबिरे (प्रसूतीपूर्व तपासणी, लसीकरण).

महिला आणि बालकांसाठी पोषण जागरूकता सत्रे.

ठिकाणी आयुष आणि योग शिबिरे.

क्षयरोग जागरूकता आणि तपासणी शिबिरे.

**रक्तदान शिबिरे.**

अवयवदान प्रतिज्ञा शिबिरे.

मोफत औषध वितरण शिबिरे.

निदान शिबिरे (पॅथॉलॉजी, एक्स-रे, ईसीजी).

**कर्करोग जागरूकता आणि तपासणी शिबिरे.**

मानसिक आरोग्य समुपदेशन शिबिरे.

व्यसनमुक्ती जागरूकता सत्रे.

किशोरवयीन आरोग्य सत्रे.

शालेय आरोग्य तपासणी शिबिरे.

स्वच्छता आणि स्वच्छता जागरूकता शिबिरे.

ब्लॉक आणि जिल्हा स्तरावर आरोग्य मेळावे / प्रदर्शने.

दुर्गम भागांसाठी टेलिमेडिसिन सल्लामसलत.

**धाराशिव जिल्हयातील सहभागी संस्था व केंद्रे :**

२१६ उपकेंद्रे
४४ प्राथमिक आरोग्य केंद्रे
२ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रे
२७ शहरी आयुषमान आरोग्य मंदीर
६ ग्रामीण रुग्णालये, ६ उपजिल्हा रुग्णालये, १ सामान्य रुग्णालये, १ स्त्री रुग्णालये, १ शासकिय वैद्यकिय महाविद्यालय.

जिल्हयातील सर्व आरोग्य केंद्रे, संस्था, वैद्यकीय महाविद्यालये व खासगी महात्मा फुले जन आरोग्य योजना संलग्न रुग्णालये सर्व खासगी वैद्यकीय व्यावसायिक संघटना यांचा अभियानात सक्रिय सहभाग लाभणार घेण्यात येणार असुन जिल्हयात हि मोहिम प्रभाविपणे राबविण्यात बाबत आरोग्य विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी यांना सुचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतिष हरिदास यांनी दिली.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649